
शुक्रवार, 20 मे 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 261
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 20 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-261 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### फुटीरतावादी नेता यासिन मलिक दोषी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काश्मीर फुटीरतावादी नेता यासिन मलिकला राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) विशेष न्यायालयाने दहशतवादी फंडिंग प्रकरणात दोषी ठरवले आहे. मागच्या सुनावणीत यासीन मलिकने दहशतवादासाठी फडिंग केल्याचे आरोप स्वीकारले होते, त्यानंतर न्यायालयाने मलिकला दोषी ठरवले आहे. एनआयने याबाबत ट्वीट केले आहे. मलिकवर गुन्हेगारी कट रचणे, देशाविरुद्ध युद्ध पुकारणे, इतर बेकायदेशीर कारवाया आणि काश्मीरमधील शांतता भंग केल्याचा आरोप होता. यासिन मलिकला पुढील सुनावणीच्या तारखेपर्यंत त्याच्या आर्थिक मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. १० मे रोजी मलिकने दिल्ली न्यायालयासमोर आपले आरोप कबूल केले होते. 10 मे रोजी झालेल्या मागील सुनावणीत न्यायालयाने फारुख अहमद दार उर्फ बिट्टा कराटे, शाबीर शाह, मसरत आलम, मोहम्मद युसूफ शाह, आफताब अहमद शाह, अल्ताफ अहमद शाह, नईम खान, मोहम्मद अकबर खांडे, राजा मेहराजुद्दीन कलवाल, बशीर अहमद यांना अटक केली होती.

# जीएसटी कौन्सिलच्या शिफारशी केंद्र-राज्यांवर बंधनकारक नाहीत

## सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : जीएसटी कौन्सिलच्या शिफारशी केंद्र आणि राज्यांवर बंधनकारक नाहीत, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. जीएसटीवर कायदा करण्यासाठी संसद आणि राज्य विधानमंडळांना समान अधिकार आहेत, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. २०१७ मध्ये सागरी मालवाहतूकाखालील जहाजांमध्ये मालाच्या वाहतुकीवर ५% आयजीएसटी आकारण्याची सरकारची अधिसूचना रद्द करण्याच्या गुजरात उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले की, केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना योग्य सल्ला देणे हे जीएसटी परिषदेचे काम आहे.**

न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सांगितले की, केंद्र सरकार आणि राज्यांना जीएसटीवर कायदा करण्याचा समान अधिकार आहे. त्यामुळे, जीएसटी परिषदेने केंद्र आणि राज्यांमध्ये सामंजस्याने काम करून तोडगा काढायला हवा.
जीएसटी कौन्सिलच्या शिफारशी या सहयोगी चर्चेचे परिणाम आहेत. त्यामुळे फेडरल युनिट्सपैकी एकाकडे नेहमीच जास्त भागीदारी असणे हे आवश्यक नाही, असेही ते न्यायमूर्ती म्हणाले.
जीएसटी कौन्सिलच्या आगामी बैठकीत कॅसिनो, हॉर्स रेसिंग, ऑनलाइन गेमिंगवर २८ टक्के कर लावण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाऊ शकतो. या विषयाचा आढावा घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्र्यांच्या समितीने आपला अंतिम अहवाल तयार केला असून तो परिषदेच्या पुढील बैठकीत सादर केला जाणार आहे. सध्या कॅसिनो, हॉर्स रेसिंग आणि ऑनलाइन गेमिंगवर १८ टक्के जीएसटी आकारला जातो.
मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनरॅड संगमा यांच्या नेतृत्वाखालील मंत्र्यांच्या समितीने या महिन्याच्या सुरुवातीला त्यांच्या शेवटच्या बैठकीत या सेवांवरील कर दर २८ टक्के करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला.

### जीएसटीची १ जुलैला ५ वर्षे पूर्ण होणार

१ जुलै रोजी जीएसटीला ५ वर्षे पूर्ण होतील. १ जुलै २०१७ रोजी देशभरात जीएसटी कायदा लागू करण्यात आला. उत्पादन शुल्क, सेवा कर, व्हॅट आणि विक्री कर एकत्र करून जीएसटी तयार करण्यात आला. जीएसटीबाबत कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील जीएसटी परिषदेकडे आहे आणि राज्यांचे अर्थमंत्री जीएसटी परिषदेचे सदस्य आहेत.

## चर्चेतली बातमी

### नवज्योतसिंग सिद्धू यांना एका वर्षाचा तुरुंगवास



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू यांना एका वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. १९८८ च्या रोड रेज प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नवज्योतसिंग सिद्धू यांना एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. रोड रेज प्रकरणी नवज्योत सिंग सिद्धूंच्या शिक्षेत वाढ करण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. या प्रकरणी पीडितेच्या कुटुंबाच्या वतीने पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने नवज्योतसिंग सिद्धू यांना दोषमुक्त करण्याच्या मे २०१८ च्या आदेशाचे पुनरावलोकन केले आहे. या आदेशानुसार सिद्धू यांना पंजाब पोलिस ताब्यात घेतील. आता आयपीसीच्या कलम ३२३ अंतर्गत सिद्धू यांना जास्तीत जास्त शिक्षा सुनावण्यात आली आहे. न्यायमूर्ती चेलमेश्वर आणि न्यायमूर्ती संजय किशन कौल यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. सुप्रीम कोर्टाने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला होता ज्यामध्ये त्यांना हत्येचे प्रमाण न मानता निर्दोष हत्येसाठी दोषी ठरवले होते.

# वालूरच्या पुष्करणीचे श्रमदानातून पुनरुज्जीवन

आधुनिक केसरी न्यूज

**सेलू :** वालूर (ता.सेलू जि.परभणी) येथील प्राचीन पुष्करिणी (बारव) संवर्धनासाठी संपूर्ण गाव एकवटले असून, दोन दिवसांच्या रात्रंदिवस श्रमदानातून हेलिकल स्टेपवेल प्रकारातील स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असलेली बारंव ग्रामस्थांनी स्वच्छ करीत पुनर्जीवित केली.
औरंगाबादचे उपविभागीय अधिकारी डॉ.सुनील भोकरे, सेलूच्या उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, सरपंच संजय साडेगावकर, शैलेश तोष्णीवाल यांच्या पुढाकाराने रविवारपासून वालूर येथील प्राचीन बारवांच्या संवर्धन कार्याने गती घेतली. विलास सोनवणे, प्रभाकर जवळकर, राजेश साडेगांवकर, मारोती बोडखे, मुकुंद मुंढे, दत्ताजी राख, प्रल्हादराव दराडे, भास्कर लांडे, भगवानराव दराडे, वाल्मिकी दराडे, नागेश दराडे, ऋषिकेश राख, कुलदीप राख, बाजीराव बोडखे, मारूती बोडखे, बबन बोडखे, श्रीहरी आबूज, गोपाळ आबूज, मामा जवळकर आदींसह ६८ ग्रामस्थांनी श्रमदान केले. जिल्ह्यात सर्वाधिक चार व सुंदर रचनेच्या बारवा वालूरमध्ये आहेत हे विशेष. ऐतिहासिक



वारसा जतन करण्यासाठी वालूरकरांनी केलेला निर्धार प्रेरणादायी ठरत असून, बारवेचे सौंदर्य न्याहाळण्यासाठी अभ्यासक व पंचक्रोशीतील नागरिकांनी गर्दी केली होती.

# ७ हजार जागांसाठी होणार पोलीस भरती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्यांसाठी तरुणांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. कारण राज्यात आता सात हजार पदांची पोलीस भरती होणार आहे. पोलीस कॉन्स्टेबल पदासाठी एकाच वेळी भरती प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. लवकरच भरती प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.
सात हजार पदांच्या भरती प्रक्रियेनंतर राज्यांत लवकरच आणखी एक मोठी भरती प्रक्रिया पार पडणार आहे. ही भरती दहा हजार पदांसाठी असल्याची माहिती मिळत आहे. सातत्याने समोर येणारे भरती प्रक्रियेतील घोटाळे लक्षात घेता आता भरती प्रक्रिया गृहखाते राबवणार आहे. ज्यातील पोलिसांचं बळ कमी आहे. त्यामुळे आम्ही मंत्रिमंडळासमोर पोलिसांची 50 हजार पदांची भरती करण्यासंदर्भात माहिती देऊ आणि त्यासंदर्भात निर्णय घेऊ, असे दिलीप वळसे पाटील म्हणाले होते. गेल्या दोन वर्षापासून देशासह राज्यात कोरोनाच्या संकटामुळे नोकरभरतीची प्रक्रिया छांबली होती. कोरोनाचा फटका पोलीस भरती प्रक्रियेला बसल्याने





आवश्यकता असताना राज्यात पोलीस कर्मचाऱ्यांची भरती होऊ शकली नाही. राज्याची लोकसंख्या लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर पोलीस बळाची गरज आहे. आता त्यामुळे राज्य सरकारने सुरू केलेल्या हालचालीमुळे पोलीस भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. वर्षातून एकदा पोलीस भरती ही होत असते. पोलीस दलात आपले कर्तव्य बजावण्याचे कित्येकांचे स्वप्न असते आणि हेच स्वप्न उराशी बाळगून वर्षभर ही लोक तयारीला लागतात. पोलीस दलात सेवा बजावण्याचे यांचे स्वप्न असते. ते पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत असतात. अशा तरूणांसाठी ही दिलासादायक बातमी आहे.


# राज्यातील १२ जिल्ह्यांना अलर्ट

## पुणे, कोल्हापूरमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याच्या विविध भागात मान्सून पूर्व पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान राज्यातील काही भागात उष्णतेची लाट असेल तर काही भागात जोरदार पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार दक्षिण मध्य महाराष्ट्र, दक्षिण कोकण आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस होण्याची शक्यता आहे. 19 ते 21 मे या कालावधीत उत्तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.
दरम्यान नांदेड जिल्ह्यात आज मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली, जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांना पावसाने झोडपले, नांदेड शहरासह हदगाव, भोकर, अर्धापूर, हिमायतनगर यासह काही ठिकाणी पाऊस पडल्याने वातावरण थंड झाले आहे. मान्सून पूर्व पडलेल्या पावसामुळे शेतीच्या मशागतीच्या कामाला आता वेग आला आहे.
हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या ठिकाणी 19 मे ते 21 मे दरम्यान विजांच्या कडकडाटा वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर अकोला, यवतमाळ, वाशीम आणि अमरावती जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. दरम्यान वर्धा शहरात काल सर्वाधिक उष्ण तापमान ४५ अंश सेल्सिअस होते.
दरम्यान भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सून येत्या दोन दिवसांत आणखी पुढे सरकण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसांत दक्षिण बंगाल उपसागराच्या काही भागात तसेच अंदमान समुद्र आणि बंगाल उपसागराच्या पूर्वेकडील काही भागात मान्सूनची वाटचाल सुरू आहे आहे.
राज्यात मान्सून सक्रीय होण्यासाठी 12 ते 15 जून उजाडण्याची शक्यता आहे. मुंबईत मान्सूनच्या आगमनाची अधिकृत तारीख 11 जून असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले. दरम्यान राज्यातील काही भागात मान्सून पूर्व हवामान तयार होत असल्याने पावसाची शक्यता आहे.
मेच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून अंदमानमध्ये दाखल होतो. दरम्यान यंदा चार दिवस आधीच पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार १३ ते १९ मे दरम्यान म्हणजेच वेळेआधी मान्सून हजेरी लावण्याची शक्यता आहे. तर केरळमध्ये २० ते २६ मेपर्यंत पाऊस दाखल होईल तर तळकोकणात २७ मे ते २ जूनपर्यंत मान्सून दाखल होईल, असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# लावण्याचा गाभा : पं. शिवकुमार शर्मा

आधुनिक केसरी

पंडितजींकडे पाहावं की त्यांच्या सुरांकडे लक्ष द्यावं यातच रसिकांचा गोंधळ व्हायचा. एकाच वेळी डोळे आणि कान तृप्त व्हायचे. पंडितजींची संगीत समाधी लागलेली असायची आणि रसिकांची श्रवणसमाधी ! कुरूपता या माणसाला मंजूरच नव्हती ! मग ती कुठलीही असो. पं शिवकुमारजींवर बोलता बोलता मला आठवले रवींद्रनाथ टागोर. टागोरही अत्यंत देखणे व्यक्तिमत्व लाभलेले महान कलाकार, शिक्षणतज्ज्ञ, संगीतकार, नाटककार, लेखक सारे सारे गुण सामावलेले अष्टपैलू व्यक्तिमत्व. त्यांच्याही अंगात रेशमी सोनेरी, अंजिरी कुर्ता. तेही सौंदर्याचे उपासक आणि पूजक होते. असं सांगितलं जातं की टागोरांना ‘ गुरुदेव ‘ ही उपाधी प्रथम महात्मा गांधींनी दिली आणि गांधीजींना ‘ महात्मा ‘ ही उपाधी प्रथम टागोरांनी दिली. दोघेही एकमेकांचे चाहते होते.
एकदा महर्षी रजनीशांनी आपल्या व्याख्यानात गांधीजी आणि टागोरांच्या भेटीचा एक प्रसंग सांगितला होता. गांधीजी एकदा टागोरांकडे राहायला गेले होते. गांधीजी कुठेही असले तरी आपले संध्याकाळचे फिरणे कधीच चुकवीत नसत. ते फिरायला निघाले तेव्हा रवींद्रनाथ म्हणाले, “ चला, मीही येतो तुमच्याबरोबर. तेवढ्याच गप्पा होतील. “ रवींद्रनाथ आरशासमोर उभे राहून आपले केस विंचरू लागले. कपडे ठाकठीक करू लागले. इकडे गांधीजी त्यांची वाट पाहत कंटाळले होते. गांधीजी त्यांना म्हणाले, “ आता या वयात कशाला पाहिजे एवढा नट्टापट्टा ? कोण तुमच्याकडे पाहणार आहे ?”
तेव्हा रवींद्रनाथांनी दिलेले उत्तर अतिशय सुंदर आणि त्यांची सौंदर्यदृष्टी स्पष्ट करणारे आहे.
ते म्हणाले, “ कोणी पाहणार आहे म्हणूनच आपण सुंदर राहायचे का ? आपण सुंदर राहिलो तर आपल्या मनाला तर चांगले वाटतेच पण समोरच्या पाहणाऱ्या व्यक्तीलाही आनंद होतो.

**(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# थेंबे थेंबे तळे साचे

आधुनिक केसरी

आपल्या हाती असलेल्या पैशाचा केवळ गरजेपुरता उपयोग करून बचतीचे तंत्र अवगत केले पाहिजे. यासाठी आपण नेहमी, अगदी प्रत्येक बाबतीत, काटकसरच केली पाहिजे असे काही नाही. पण पैसे खर्च करण्यापूर्वीच आपल्या गरजांची योग्यता, त्यांची आपण करत असलेली अपेक्षा आणि त्यांची पूर्तता ह्या सर्वच बाबींचा अभ्यासपूर्वक विचार केला पाहिजे. एकदा गरजा निश्चित केल्या, कि माघार घेऊन पैसे वाचवण्याची आवश्यकता नाही. परंतू त्या गरजांची पूर्तता करण्याची जिद्द आपल्यात निर्माण होणे जरुरीचे असते. आपल्या गरजांची पूर्तता झाल्यावर शिल्लक राहणाऱ्या पैशाची बचत करण्याकडे अनेकांचा कल असतो, अर्थात ते स्वाभाविकच असते. परंतु या व्यतिरिक्त निराळे तंत्र आपण आत्मसात करून केलेली बचत अधिक चांगल्याप्रकारे होऊ शकते. अन्यथा कष्टाने मिळवलेला पै पैसा आपण बचतीच्या माध्यमातून भविष्यातील गरजांसाठी, आणीबाणीच्या काळांत जरुरी भासल्यास, साठवून ठेवला नाही तर, ते सारे काही व्यर्थ गेल्यासारखेच असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

“थेंबे थेंबे तळे साचे” या उक्तीप्रमाणे दरमहा दैनंदिन गरजांची पूर्तता करून शिल्लक राहिलेल्या अथवा बचत करून बाजूला ठेऊन दिलेल्या आपल्या पै पैशाची वृद्धी होणे देखील तितकेच गरजेचे आणि आवश्यक असते. अनेकदा आपल्याला यासाठी योग्य पर्याय सापडत नाहीत; बचतीचे पैसे एकतर आपल्याकडून खर्च तरी होतात, अथवा तसेच पडून राहतात. यासाठी अगदी सोपा, सोईस्कर पर्याय निवडून त्या माध्यमातून आपल्या बचतीच्या पैशाची गुंतवणूक करणे जरुरीचे असते. त्यांतूनही सरकारी व्यवस्थेत केलेली गुंतवणूक अधिक सुरक्षित असते आणि त्यामुळेच याद्वारे मिळणारा परतावा अर्थात मोबदला हमखास मिळतो. त्यादृष्टीकोनातून अशा प्रकारच्या गुंतवणूकीचा विचार आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने करावा.



आधुनिक केसरी

## संत सेवा चित्ती | नांदो देवा ||

**कर्मावीन नाही | सुटका देहाची ||**
**परी सत्कर्माची | साथ हवी ||१||**

**संगतीने वाढे | कर्माचे फलित ||**
**जाण सत्संगात | ब्रह्म सुख ||२||**

**ध्यानी ठेव मना | नाशाचे कारण ||**
**पापाचे पोषण | कुसंगती ||४||**

**उत्तम ते वर्म | भाव शुद्ध कर्म ||**
**जागावा स्वधर्म | अखंडीत ||४||**

**जैसी ज्याची श्रध्दा | तैसी त्याची वृत्ती ||**
**संत सेवा चित्ती | नांदो देवा ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**अकरुणत्वमकारणविग्रहः परधने**
**परयोषिति च स्पृहा ।**
**सुजनबन्धुजनेष्वसहिष्णुता प्रकृति-**
**सिद्धमिदं हि दुरात्मनाम् ॥**

**अर्थ :** करुणेचा अभाव, कारण नसतानाही कलह करणे, परधन आणि परस्त्रीची इच्छा करणे, तसेच सज्जन आणि आप्तजनांविषयी असहिष्णुता ही दुर्जनांचे सहज लक्षण आहेत. या श्लोकात कविराज भर्तृहरींनी दुर्जनाची मुख्य लक्षणे सांगीतली आहेत. करुणेचा अभाव दुर्जनांच्या ठिकाणी असतो. असहिष्णू वृत्ती असते. जे आपले नाही, त्याची लालसा असते. आणि दुर्जनाची ही सहज म्हणजे स्वाभाविक लक्षणे आहेत; असे प्रतिपादन भर्तृहरींनी केले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## भगवंताचे प्रेम वाढविण्याची कृती करावी



आधुनिक केसरी

जगात देवाणघेवाण हा नियमच आहे. लाकडाचे दोन तुकडे जोडायचे असतील तर प्रत्येकाचा थोडा थोडा भाग तासून नंतर एकमेकात बसवितात, आणि मग उत्तम रीतीने सांधा बसतो. त्याप्रमाणे, प्रत्येक माणसाने आपापले दोष जर थोडे थोडे तासून टाकले, तर परस्परप्रेमाचा सांधा खात्रीने उत्तम बसेल. याकरिता विचाराने आणि काळजीने वागणे जरूर आहे. घरामध्ये काय किंवा बाहेर काय, प्रेमाचा धाक असावा, भितीचा धाक असू नये. जसे आई आणि मुलांचे प्रेम असते तसे भगवंताचे प्रेम लावावे आणि त्याप्रमाणे आपण वर्तन ठेवावे. असा नियम आहे की, ज्याला आतबाहेर भगवंताचे प्रेम आले, तो भजनामध्ये नाचत असताना त्याचा स्पर्श दुसऱ्याला झाला, की तोही भगवंताच्या प्रेमाने नाचू लागतो. भगवंताचे प्रेम हे एक मोठे वेड आहे; ते ज्याला लाभेल तो भाग्याचा खरा ! एक भगवंताचे प्रेम लागले, की वाणीमध्ये सर्व चांगले गुण येतात. पुस्तके वाचून किंवा नुसत्या बुद्धीने जगाची अशाश्वतता केव्हाही कळणार नाही. भगवंताचे प्रेम वाढले की ती आपोआप कळू लागते. एखाद्या माणसाचे तोंड आल्यावर, पोटामध्ये भूक असूनसुद्धा, त्याला खाता येत नाही, किंवा अन्नाची चव लागत नाही. त्याचप्रमाणे, आतमध्ये भगवंताचे प्रेम असूनसुद्धा, आपण बाहेर प्रपंचामध्ये आसक्त असल्यामुळे भगवंताच्या नामाची गोडी वाटत नाही. तोंड बरे व्हायला जसे प्रथम औषध घ्यावे, त्याचप्रमाणे, नामाची गोडी यायला आपण प्रपंचाची आसक्ति कमी करावी. ही प्रपंचाची आसक्ति सोडणे किंवा कमी करणे, हे फार कठीण काम आहे. त्याकरिता भगवंताबद्दल आपलेपणा, अनुसंधान, आणि सत्संग हेच तीन उपाय आहेत. भगवंत हा बहुरूपी आणि अनंत ठिकाणी नटणारा असा आहे, म्हणून त्याच्या प्राप्तीसाठी अनंत साधने असली पाहिजेत. ज्याच्या त्याच्या मनोरचनेप्रमाणे जो तो आपले साधन करील, पण या सर्व साधनांच्यामध्ये भगवंताचे प्रेम हे सर्वसामान्य असले पाहिजे. भगवंताचे प्रेम येईल, तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील. खरोखर, भगवंताचे प्रेम एकदा चिकटले की त्याच्या आड दुसरे काहीही येऊ शकत नाही. भगवंताच्या नामाला नीति हे पथ्य आहे. ते सांभाळून जो वागेल, त्याचे भगवंतावरचे प्रेम वाढेल. भगवंतावर अत्यंत निष्ठा ठेवा, प्रेम ठेवा. भगवंत हा कष्टसाध्य नसून सुलभसाध्य आहे. जो हीनाहून हीन आणि अडाण्यांतला अडाणी आहे, त्यालासुद्धा मिळणारा असा भगवंत आहे.
**आजचे बोधवचन :** ज्याला भगवंताचे प्रेम यावे असे वाटते, त्याने नाम घेणे हाच एक मार्ग आहे.

**-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# जसे पेरावे तसे उगवते

जीव जन्मला की कर्माला आरंभ होतो. कर्माला प्रारंभ झाला की थांबता येत नाही. अखंड कर्म करणं भाग पडतं. कर्मापासून कोणाचीही सुटका होऊ शकत नाही. एकदा का जीव मनुष्य योनी मध्ये आला की, मन, बुद्धी, चित्त, अहंकार, येतात. त्याचप्रमाणे पूर्व संस्कारानुसार त्याचे मन चांगली, वाईट कर्म करण्यास प्रवृत्त होते. शिवाय ज्या कुळात जन्म घेतला असेल, त्याचा संस्कार त्याच्यावर होत राहतो. अनुकूल परिस्थितीत व प्रतिकूल परिस्थितीनुसार कर्म बदलत जातात. संगत संस्कार यावर प्रत्येक माणसाची कर्म अवलंबून असतात. सज्जन, संत, सात्विक, संगतीचा सुपरिणाम होऊन, माणूस उत्तम कार्य करण्यास प्रवृत्त होतो. उत्तम कर्म हातातून उघडण्यासाठी मन व बुद्धी सुयोग विचारांकडे वळणं अत्यावश्यक असते. दोन्हींची धाव सत्कर्माकडे गेली की, उत्तम कर्म केली जातात.चांगली-वाईट, सुयोग्य-अयोग्य, उत्तम-निकृष्ट, कर्माच्या धाग्यांनी माणसांच्या आयुष्याचं वस्त्र विणलं जातं. यामधून सुख-दुःखाची गुंफण होत जाते. चांगली, सुयोग्य, उत्तम कर्म केली की, सुखचं सचैल स्थान घडतं. सुखामधून समाधानची पवित्र गंगा अवतीर्ण होते. शांतीचं सुखद, सुंदर सुर्वणपात्र हाती येतं. जसे कर्म असेल, तसे फळ मिळते. कर्मानुसार फळप्राप्ती हा सृष्टीचा नियम व न्याय आहे. त्यामध्ये कोणीही ढवळाढवळ करू शकत नाही. सृष्टीचा निर्माता परमात्मा परमेश्वराचा न्यायनिवाडा अचूक असतो. पृथ्वीवर न्यायालयाचे न्यायाधीश योग्य न्याय देणार नाहीत. पैशाच्या जोरावर साक्षी पुरावे बदलले जातात. अपराधी सुटू शकतो. परंतु भगवंताचं न्यायालय सर्वोच्च न्यायालय आहे. तिथे लाच, बदनामी इ. प्रकार कुचकामी ठरतात. माणसाने भगवंताला फसवण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी काहीही उपयोग होत नाही. माणसाच्या प्रत्येक कर्माची अचूक नोंद त्याच्याकडे असते. त्याच्या संगणकामधील डाटा कधीच उडत नाही. गोंधळ-गफलत भगवंताच्या खात्यामध्ये कधीच होत नाही. चित्रगुप्त कधीच रजेवर जात नाही. तो प्रत्येक जीवाच्या कर्माची नोंद घेताना कधीच कंटाळत नाही. परमात्मा परमेश्वराच्या राज्यात खातेवाटपात गोंधळ नसतो. रजिस्टरमध्ये विभागानुसार नोंद करणे चालू असते.माणसाला कुकर्म, वाईट कर्म, दुष्कर्म करताना भगवंताच्या न्यायालयाचे विस्मरण होते. स्वार्थाने बरबटलेल्या, वासनांच्या आधीन झालेल्यांना भगवंताचा सर्वोच्च न्याय-निवाडा लक्षात राहणं अवघड आहे. त्याच्याइतका न्यायी संपूर्ण विश्वामध्ये अन्य कोणीही नाही. त्याच्या लाठीचा आवाज मोठा नसतो. परंतु त्याची लाठी अन्यायी, अनिती यांच्या पाठीत हमखास बसते. माणसाची पृथ्वीवरच्या न्यायालयामधून सुटका होणे अशक्य असते.जसे पेरावे तसे उगवते, चांगलं बी पेरलं तर चांगलंच उगवेल. अमृत पेरलं जर अमृतच उगवेल. विषारी बी पेरलं, तर त्याला विषारी फळेच येतील. हे तर आपण निर्सगात बघतो, विष पेरल्यावर अमृताची गोड फळं आलेली कधीच दिसत नाहीत. जे पेराल तेच भूमीतून वर येतं. सत्कर्म पेरलं तर उत्तम, मधुर अशी फळं येतात. लोकांशी सहकार्याने, सहयोगाने वागले तर लोक आपल्याशी चांगले वागतात. पेरणी चांगली करण्यासाठी काया, वाचा, मने अशा तीन स्तरांवर कष्ट घ्यावे लागतात. त्याकरिता सत्संगाची आवश्यकता असते. भगवान श्रीकृष्णाने सांगितलेल्या गीतेनुसार आचरण करतो, त्याच्यावर भगवान प्रसन्न होतो. त्याच्या समीप वावरतो. परमात्मा परमेश्वर श्रीकृष्णाने कर्माविषयी अमूल्य उपदेश भक्तांना केलेला आहे. कर्म करण्याआधी विचार करणं आवश्यक ! एकदा हातून कर्म घडून गेलं की, परिणाम आपल्या हातात नसतात. सात्विक, उत्तम कार्य करण्याचा आटोकाट प्रयास करावा लागतो. कर्म केल्यावर चांगल्या फळाची अभिलाषा बाळगू नकोस, असे अर्जुनाला भगवंत सांगतो, हे अवघड आहे. फळाच्या आशेनेच अनेक कर्म केली जातात.परमार्थाच्या पवित्र मार्गावर चालणार्या भक्ताची अवस्था हळूहळू बदलत जाते. मग तो केलेली कर्म रोज भगवंताला अर्पण करायला लागतो. त्यामुळे तो आसक्तीरहित होत जातो. एका उच्च, श्रेष्ठ भक्ताची भावावस्था निष्काम कर्मायोगापर्यंत जाते.

# शिरपूरजवळ वन्यप्राण्याचा धुमाकूळ; हल्ल्यात मुलगा गंभीर जखमी



आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** शिरपुर तालुक्यातील गोदी (सावेर) शिवारात वसंत लिलाचंद राजपूत यांच्या शेतात अमसिंग किलगसिंग पावरा हा रखवालदार म्हणून काम करतो. अमसिंग रात्री शेतातील झोपडीच्या बाहेर झोपलेला असताना अचानक एका हिंसक प्राणीने त्याचा हातावर हल्ला केला तर आज दि.१९ मे रोजी सकाळी एका १४ वर्षीय मुलावर त्या वन्यप्राण्याने हल्ला केला आहे. यात रखवालदाराला रात्री जखमी अवस्थेत शिरपूर उपजिल्हा रुग्णालयातून धुळे येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. शेतकऱ्यांमध्ये भितीचे पसरले आहे. घटनेची खबर मिळताच वनविभाग, प्राणी मित्र व थाळनेर पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले होते.

सावेर शिवारात वसंत लिलाचंद राजपूत यांच्या शेतात अमसिंग किलगसिंग पावरा नेहमी प्रमाणे रात्री शेतातील झोपडीच्या बाहेर झोपलेला असतांना अचानक एका हिंसक प्राणीने त्याचा हातावर हल्ला केला. त्याने आरडाओरड आले. तेथून पुढील उपचारासाठी केल्यानंतर नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी तो हिंसक प्राणी ऊसाच्या शेताच्या दिशेने पळून गेला अमसिंग याला जखमी अवस्थेत रात्री शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात धुळे येथे पाठविण्यात आले आहे. हातावर दुखापत झाले आज दि.१९ मे रोजी गोदी शिवारात सकाळी सुधाकर सोनजी धनगर यांच्या शेतात जाणाऱ्या विजय ताल्या पावरा वय १४ याच्यावर देखील वन्यप्राण्याने हल्ला करत निर्माण झाले आहे. त्याचा पायावर दुखापत झाली आहे. हल्ला करणारा प्राणी बिबट्या होता की तरस हे समजू शकलेले नाही. वन्य प्राण्यांच्या हल्ल्याची सलग दुसरी घटना घडल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मध्य प्रदेशच्या धर्तीवर ओबीसी आरक्षण राज्यातही आवश्यक : माजी आ.गजानन घुगे

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** महाराष्ट्रामध्ये ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुक व मध्यप्रदेशमध्ये तेथील सरकारला आरक्षण टिकविण्यात यश आले असुन महाराष्ट्र सरकारला मात्र अपयश आले आहे. ओबीसी आरक्षण पुर्नस्थापित होत नाही तोपर्यंत आमचा लढा सुरुच राहिल अशी माहिती भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय सदस्य माजी आ.गजानन घुगे यांनी दिली. मध्यप्रदेश शासनाने एम्पिरिकल डेटा तयार करून संपूर्ण अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय अहवाल सादर करण्यास सांगितला. त्यानुसार अहवाल सादर केला आणि आज त्यानुसार ओबीसी आरक्षणाची परवानगी मिळाली असल्याची माहिती भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीय सदस्य माजी आ.गजानन घुगे यांनी दिली.

माजी आ.घुगे म्हणाले की, ओबीसी आरक्षणासाठी एम्पिरिकल डेटा सादर करा, परंतु महाविकास आघाडीचे नेते केंद्र सरकारकडे बोट दाखविण्यात मग्न होते. वर्षभरानंतर मागासवर्ग आयोग गठीत केला, तर त्यांना निधीच दिला नाही. मध्यप्रदेशने लगेच मागासवर्ग आयोग नेमला होता. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारने ओबीसी आरक्षणाची हत्या केली आहे. महाराष्ट्रात निव्वळ राजकारण झाले. मंत्रीच मोर्चे काढत राहिले आणि निव्वळ भाषणे करीत राहिले. त्यामुळे महाराष्ट्रातील ओबीसी समाज राजकीय आरक्षणाला मुकला. आम्ही जेव्हा वारंवार सांगत होतो की, ट्रिपल टेस्ट करा. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा आदेश त्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा आहे. मुख्यमंत्र्यांनी तर या प्रश्नात लक्षच घातले नाही. आता सरकारमधील जबाबदार मंत्र्यांनी राजीनामा द्यावा. मध्यप्रदेशने ट्रिपल टेस्ट केली म्हणून त्यांना ओबीसी आरक्षणाची परवानगी मिळाली. महाराष्ट्राने 'ट्रिपल टेस्ट' केली असती, तर महाराष्ट्रातही ओबीसी आरक्षण मिळाले असते. हा डेटा सादर होत नाही आणि ओबीसी आरक्षण पुनर्स्थापित होत नाही, तोवर रस्त्यावर आमचा संघर्ष सुरूच राहणार असल्याची भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीय सदस्य गजानन घुगे यांनी दिली.



# हिंदी विश्वविद्यालयात गोशाळेचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात महत्वाकांक्षी योजने अंतर्गत गोशाळा सुरु करण्यात आली आहे. विश्वविद्यालयाच्या उत्तरी परिसरात गोशाळेकरिता तयार करण्यात आलेल्या ठिकाणी 25 गायी आणण्यात आल्या आहेत. मंगळवार 17 रोजी प्र कुलगुरु प्रो. हनुमानप्रसाद शुक्ल यांनी गायींचे पूजन करुन गोशाळेचा शुभारंभ केला. याप्रसंगी डॉ. जगदीश नारायण तिवारी यांनी मंत्रोपचार करत पूजनाचा विधी केला.

गो अनुसंधान केंद्र, देवलापार येथून या गायी प्राप्त झाल्या असून त्या देशी प्रजातीच्या आहेत. गायींच्या देखभालीसाठी गोठा, चारा आणि इतर व्यवस्था करण्यात आली आहे.

गोशाळेच्या माध्यमातून शेणखत व गोमूत्र आधारित रोजगाराचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था विश्वविद्यालय आगामी काळात करणार आहे. पशु चिकित्सक डॉ. प्रसन्न बम व प्र कुलगुरु डॉ. चंद्रकांत रागीट यांनी या गायी देवलापारहून आणल्या आहेत. शुभारंभप्रसंगी डॉ. चंद्रकांत रागीट, महात्मा गांधी फ्यूजी गुरूजी सामाजिक कार्य अध्ययन केंद्राचे निदेशक प्रो. मनोज कुमार, संस्कृती विद्यापीठाचे प्रो. नृपेंद्र प्रसाद मोदी, डॉ. अनिल कुमार दुबे, डॉ. अनवर अहमद सिद्दीकी, कार्यकारी कुलसचिव सुशील पखिडे, सहायक कुलसचिव डॉ. राजेश्वर सिंह, जनसंपर्क अधिकारी बी.एस. मिरगे, ब्रजेश पाटिल, संगीता मालवीय, तुषार वानखेडे यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते.

# सनाढ्य ब्राह्मण सेवा संघ यांच्यातर्फे सामूहिक उपनयन संस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दि.18 मे रोजी सनाढ्य ब्राम्हण सेवा संघ यांच्यातर्फे सामूहिक उपनयन संस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विविध ठिकाणच्या इच्छुक व्यक्तींनी नोंदणी केली होती. त्याप्रमाणे पहिल्या सत्रात 7 बटूंवर पुर्णपणे मोफत उपनयन संस्कार करण्यात आले. या सोबतच अत्यंत सुग्रास असे भोजन देखील बटुंच्या नातेवाईक व उपस्थित सर्वांना संघाच्या वतीने देण्यात आले. कार्यक्रम अतिशय उत्साह व शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आला होता.

उपनयन संस्कार शास्त्रोक्त व पूर्ण विधिवत करण्याकडे आयोजकांनी विशेष लक्ष दिले. बटूंची सुंदर अश्या रथामध्ये काढण्यात आलेली मिरवणूक सर्वांचे आकर्षण केंद्र ठरली.

सर्व नातेवाइकांनी आयोजकांचे कौतुक करत नेत्रदीपक असा सोहळा झाल्याचे मत व्यक्त केले. तसेच पुढील सत्रात ५१ बटूंवर उपनयन संस्कार करणार असल्याचे संसघाचे उपाध्यक्ष राजेंद्रप्रसाद जनार्धन मिश्रा यांनी संगितले. या कार्यक्रमाकरिता संघाचे अध्यक्ष रमेशप्रसाद थारेवाल, उपाध्यक्ष राजेंद्रप्रसाद



मिश्रा, कोषाध्यक्ष विनोद प्रसाद, सह-सचिव दर्शन पाराशर, दिनेश पांडे, महेश नेवासकर, रमेश दिक्षित, विकास मिसर, शिवकुमार थारेवाल, सुनील दीक्षित यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमास उत्तरदेशीय ब्राम्हण सेवा संघाच्या वतीने सचिन अवस्थी यांनी तसेच समाजातील दानशूर चौधरी यांनी उपस्थित राहून शुभेछा दिल्या.

# बनावट कागदपत्रे बनवून ट्रकची विक्री करणाऱ्या टोळीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बनावट कागदपत्र आणि बनावट नंबर प्लेट व चेचीस नंबर मध्ये हेरफार विक्री करणारी टोळी धुळे स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने गजाआड करीत तब्बल 1 कोटी 44 लाख रुपयांच्या 12 ट्रक पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहे.

धुळे शहरातील चाळीसगाव रोड भागात असलेल्या इकरा कॉलनी येथे राहणाऱ्या शेख साजिद शेख अब्दुल हा ट्रान्सपोर्ट कमिशन एजंट चा व्यवसाय करतो, त्याच्या घरासमोर असलेल्या मोकळ्या जागेत आठ ट्रक उभे केले असून सदर ट्रक वरील इंजिन आणि चेसिस नंबर मध्ये आदलाबदल केल्याची गुप्त माहिती धुळे स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शेख साजिद शेख अब्दुल याची चौकशी केली असता त्याने या ट्रक विक्रीसाठी आणल्याचे सांगितले, सदर ट्रकांची आरटीओ कार्यालयाकडून खात्री केली असता त्यांचे चेसिस नंबर आणि इंजिन नंबर हे खाडाखोड करून बनावट कागदपत्रांच्या आधारे ते विक्री करत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला मिळाली.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने सखोल तपास करीत या कारवाईत तब्बल 12 ट्रक जप्त केल्या असून या कारवाईत तब्बल 1 कोटी 44 लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी साजिद शेख अब्दुल मनियार, आरटीओ एजंट इफतेकार अहमद अब्दुल जब्बार शेख ऊर्फ पापा एजंट त्यांना ताब्यात घेण्यात आले असून सदर आरोपींनी साथीदारांच्या मदतीने संगनमताने सदर बनावट ट्रक स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी शासनाची फसवणूक करून वापरासाठी तसेच विक्री करण्याच्या उद्देशाने बनावट इंजिन नंबर प्रेस करून ट्रक वापरत असल्याचे सांगितले आहे.

# 'पेपरवाल्या मामां'चा प्रवास थांबला

## मुक्तिराम गुंजकर यांचे सेलूत निधन, विविध स्तरांतून हळहळ

आधुनिक केसरी न्यूज

**सेलू :** मुक्तिराम अप्पाराव गुंजकर (वय ६५, रा.श्रीकृष्ण नगर, पाथरी रोड, सेलू जि.परभणी) यांचे बुधवारी (१८ मे) उपचारादरम्यान निधन झाले. आणि गेल्या ३८ वर्षांहून अधिक काळ हरेक वृत्तपत्रांच्या माध्यमातून ज्ञान, विज्ञान, मनोरंजन, माहिती, घटना, घडामोडींच्या बातम्या घरोघरी पोहोचविणाऱ्या मुक्तिराम मामांचा वृत्तपत्र सेवेचाअखंडप्रवास अखेर थांबला. या दुर्दैवी घटनेनंतर शहरातील विविध स्तरातील नागरिक, वाचकांमधून हळहळ व्यक्त होत आहे. रविवारी (१४ मे) दुपारी पाचव्या सुमारास, छतावर वाळत घातलेले गहू पायऱ्यांवरून आणतांना मामांचा तोल गेला. त्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. परभणी येथे खासगी रुग्णालयात उपचारासाठी त्यांना दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान बुधवारी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बालाजी न्यूज पेपर एजन्सीच्या स्टॉलचे प्रतिनिधी शिवाजी हावळे यांचे ते व्याही होत.

मुक्तिराम मामा हे सेलू शहरातील खोना न्यूज पेपर एजन्सीमध्ये एक नोव्हेंबर १९८४ पासून वृत्तपत्र वाटपाचे काम करीत होते. अत्यंत सचोटीने, निर्धारपूर्वक आणि प्रामाणिकपणे वृत्तपत्र वाटपाचे व्रतत्यांनी घेतले होते. मनमिळावू स्वभावामुळे ते अल्पावधीतच वाचक प्रिय झाले होते. मामा, सुरुवातीला सरस्वती जिनिंगमध्ये रोजमजुरी करून, खोना न्यूज पेपर एजन्सी मध्ये पेपर वाटपाचे



काम करीत. ज्या वेळी मुंबई येथील महाराष्ट्र टाइम्सची शहर आवृत्ती शहरात सायंकाळी येत असे, त्यावेळी सरस्वती जिनिंगमधील काम आटोपून मामा सायंकाळीसुद्धा हे वृत्तपत्र वाटप करीत. क्वचितच ते बाहेरगावी गेले, तरच त्यांचे पेपर वाटप थांबायचे. ऊन, वारा, पाऊस आणि थंडीचीही तमा न बाळगता, अगदी करोनाच्या काळातही त्यांनी घरोघरी जाऊन वृतपत्र वाटप केले. अशा भावना पूनमचंद खोना यांनी व्यक्त केल्या. एक अतिशय सज्जन, कष्टाळू व प्रामाणिक व्यक्तिमत्त्व म्हणून मुक्तिराम गुंजकर यांची ओळख होती, अशा शब्दांत ज्येष्ठ पत्रकार डी.व्ही. मुळे यांनी श्रद्धांजली वाहिली. मामांच्या अवचित जाण्याने एक सच्चा वृत्तपत्र सेवक हरवल्याची भावना शिक्षक तथा पत्रकार बाबासाहेब हेलसकर यांनी यक्त केली, तर घटनेच्या आदल्यादिवशी पर्यंत पेपर वाटणारे मुक्तिराम मामा, मेहनती, चिकाटीने आयुष्य जगले. व्यवहार पारदर्शकता आणि वाटपाची प्रामाणिकपणे त्यांनी सेवा दिली. त्यांच्या दुर्दैव निधनाने परिवारातील एक सच्चा सदस्य गमावल्याची भावना आहे. खोना परिवार व सेलूतील सर्व पत्रकार बांधव मुक्तिराम मामांच्या कुटुंबीयांसोबत कायम आहेत, अशी संवेदना राष्ट्रीय पत्रकार संघाचे सदस्य तथा वृत्तपत्र वितरक जयचंद खोना यांनी व्यक्त केली.




# हार्दिकचे फटके

आधुनिक केसरी

हार्दिक पटेल यांनी बुधवारी काँग्रेसला रामराम ठोकला. गेल्या काही महिन्यांपासून बंडाचे निशाण फडकविणारे पाटीदार समाजाचे नेते हार्दिक पटेल यांनी अखेर बुधवारी गुजरात प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्षपदासह पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. गुजरातमध्ये वर्षाअखेर विधानसभा निवडणुका होणार असताना काँग्रेसला हा मोठा धक्का मानला जातो. आता पक्ष सोडल्याच्या दुसऱ्याच दिवशी हार्दिक पटेल यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. काँग्रेस हा 'सर्वात मोठा जातीयवादी पक्ष' आहे, अशी टीका हार्दिक पटेल यांनी केली आहे. अहमदाबादमध्ये पत्रकार परिषदेला संबोधित करताना हार्दिक पटेल यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. काँग्रेस हा सर्वात मोठा जातीयवादी पक्ष आहे आणि राज्य युनिटच्या कार्यकारी अध्यक्षांनी त्यांना कोणतीही कर्तव्ये न सोपवली नाही. कार्याध्यक्षांच्या जबाबदाऱ्या केवळ कागदावर आहेत. मला दोन वर्षे कोणतीही जबाबदारी देण्यात आली नाही. यावेळी हार्दिक पटेल यांनी भाजपात प्रवेश करण्याच्या अफवा फेटाळून लावल्या आहेत. भाजपामध्ये प्रवेश करण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी पाटीदार नेत्यांची माफी मागितली. मी ज्येष्ठ पाटीदार नेत्यांची आणि मित्रांची माफी मागतो. त्यांनी मला काँग्रेसमध्ये न जाण्याचा सल्ला देत सावध केले होते. परंतु मी ऐकले नाही. त्यांच्या सल्ल्याचा अर्थ आता मला कळला आहे, असे पटेल यांनी म्हटले. हार्दिक पटेल यांनी बुधवारी काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांना पाठवलेल्या राजीनामा पत्रात प्रदेश काँग्रेस नेत्यांबरोबरच शीर्ष नेतृत्वालाही लक्ष्य केले. गुजरात आणि गुजरातींबद्दल द्वेष असल्यासारखे पक्षाच्या नेतृत्वाचे वर्तन होते. मी अनेकदा गुजरातमधील समस्यांकडे नेतृत्वाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, जेव्हा-जेव्हा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना भेटून काही मुद्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचे मोबाइलवर अधिक लक्ष असल्याचे आढळले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे गांभीर्याचा अभाव असल्याचे दिसले, अशी टीका करत हार्दीक पटेल यांनी राहुल गांधी यांना लक्ष्य केले. देशाला किंवा पक्षाला गरज असताना काही नेते परदेशात मौजमजा करत होते, असेही हार्दिक पटेल यांनी या पत्रात म्हटले होते.

भूमिका



प्राचार्य जीवन देसाई

# वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ द्यावी, ती बंद करू नये

आधुनिक केसरी

**मुदतवाढ मिळावी यासाठी मराठवाडा जनता विकास परिषदेकडून अनेक वेळा मा. राज्यपाल, मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा, निवेदने कलेक्टर कचेरीसमोर धरणे, निदर्शने, लोकप्रतिनिधी म्हणजेच आमदार, खासदार यांच्या मार्फत गाऱ्हाणे मांडूनही महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारकडून याबाबत काही प्रतिसाद लाभला नाही.**

दिनांक 1 मे 1994 पासून कार्यान्वित झालेली मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रासाठीची ही तीन विकास मंडळे दर पाच वर्षानंतर त्यांना मुदतवाढ मिळाल्याने 30 एप्रिल 2020 पर्यंत कार्यरत राहिली. त्यानंतर पुढे पुन्हा मुदतवाढ मिळावी यासाठी मराठवाडा जनता विकास परिषदेकडून अनेक वेळा मा. राज्यपाल, मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा, निवेदने कलेक्टर कचेरीसमोर धरणे, निदर्शने, लोकप्रतिनिधी म्हणजेच आमदार, खासदार यांच्या मार्फत गाऱ्हाणे मांडूनही महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारकडून याबाबत काही प्रतिसाद लाभला नाही. भारताच्या संविधानातील कलम 371 (2) मधील तरतुदीनुसार राज्यातील मागास प्रदेशाच्या विकासासाठी 'योग्य समन्यायी विकासनिधी' राज्यपालांनी त्यांचे खास अधिकार वापरुन उपलब्ध करून द्यावा. या हेतूने स्थापन करण्यात आलेल्या वैज्ञानिक विकास मंडळांना मुदतवाढ न देता महाराष्ट्र शासन कसे काय डोळेझाक करून बसले आहे. आणि मा. राज्यपालांच्या ते निदर्शनास आणल्यावरही ते काहीच निर्देश देत नाहीत हे खरोखरच अनाकलनीय आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या गतवर्षी आणि यावर्षी झालेल्या अधिवेशनात विरोधी पक्षनेते व काही आमदारांनी याकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मा. उपमुख्यमंत्री यांनी असे सांगितले की, मा. राज्यपाल महोदयांनी विधानपरिषदेवरील आमदारांच्या नियुक्तीस मान्यता दिल्यानंतर विकास मंडळांना मुदतवाढ दिली जाईल. मा. राज्यपालांनी विधान परिषदेतील बारा आमदारांच्या नियुक्त्या करणे-न करणे याचा विकास मंडळाला मुदतवाढ देण्याशी कसलाही संबंध नाही. निष्कारण शासनाकडून चालढकल चालू आहे. मराठवाड्याच्या विविध क्षेत्रातील विकासाचा अनुशेष पुन्हा एकदा निश्चित करण्याची वेळ आली आहे. कारण तो वाढतच चालला आहे.

**पूर्व इतिहास**

डॉ. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समितीने 1984 साली सादर केलेला अहवालानंतर पुन्हा नव्याने अनुशेषाची हिशेब मांडून राज्यातील विभागवार विकासाच्या असमतोलाचे अद्यावत चित्र आणि वास्तव मा. राज्यपालांचे व शासनाच्या समोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ,तिनही विकास मंडळाच्या संयुक्त निर्देशांक व अनुशेष समितीने आदरणीय कै. भुजंगरावजी कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल 1997 मध्ये अहवाल सादर करून केले असून या निःपक्ष व मौलिक अहवालात मागास भागांच्या विकासासाठी दुरगामी शिफारशी करण्यात आल्या होत्या. मा. राज्यपालांनी या समितीच्या शिफारशी 2000 मध्ये स्वीकारून मागास विभागाच्या अनुशेष निर्मूलनासाठी पाहिल्यानेच 2001 ते 2002 च्या वार्षिक योजनेत तरतूद करून उर्वरित राहिलेला अनुशेष पाच वर्षात दूर कसा करावा असे निर्देश राज्य सरकारला दिले होते. एवढेच नाही तर मा. राज्यपालांनी संबंधितांशी चर्चा करून 15 डिसेंबर 2001 रोजी राज्य शासनास घटनात्मक आदेश जारी करून या आदेशान्वये सिंचनासाठी वर्षासाठी वार्षिक तरतूद वगळता उरलेल्या निधीची विभागवार वाटणी लोकसंख्येच्या प्रमाणात करावी असे सांगितले होते. एका विभागासाठी केलेला अंदाजपत्रकातील तरतुदी दुसऱ्या विभागाकडे वळवू नयेत, वर्ग करू नयेत अशी 1994 च्या कायद्यात तरतूद असतानाही असे प्रकार वेळोवेळी होत राहिले. याकडे विकास मंडळानी दुर्लक्ष केले.

**विकास मंडळाने केलेली कामगिरी**

विकासाच्या विविध क्षेत्रात आवश्यक ती सर्वेक्षणे करून त्यांचे अहवाल सादर करणे ,प्रादेशिक अनुशेषाच्या निर्मूलनासाठी सूत्रानुसार निधी मिळवून त्याचा संबंधित खात्यामार्फत विनियोग व्हावा याकडे लक्ष ठेवणे, मराठवाड्यास कृष्णा खोऱ्यातून त्यांच्या हक्काचे पाणी मिळावे, तसेच तापी खोऱ्यातील पाण्यासाठी निधी आदेशित व्हावा यासाठी शासनाकडे शिफारस करणे. इत्यादी महत्त्वाच्या विकास मंडळाने केलेल्या कार्याचा आवर्जून उल्लेख करता येईल. 1994 मध्ये वैधानिक विकास मंडळे स्थापन करावयाचा अध्यादेश मा. राज्यपाल यांनी काढला त्यानुसार मंडळाचे सात सदस्य ज्यात- तीन तज्ज्ञ, एक आमदार, एक स्थानिक स्वराज्य संस्था सदस्य ,एक विभागीय आयुक्त आणि उपायुक्त असथील असे ठरले होते. वैज्ञानिक विकास मंडळाच्या अध्यक्षपदी मान्यवर तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती करून विशेष निधी म्हणून शंभर कोटी रुपये दिला जात असे . काही काळ लोटल्यावर हा निधी कमी केला गेला . वैधानिक हा शब्दही आता नावामागे लावण्याचे टाळून प्रादेशिक विकास मंडळ असे संबोधले जात आहे. या विकास मंडळाला आता शिफारशी करण्याचे अधिकार राहिले आहेत. तरीही राज्यातील मागास राहिलेल्या प्रदेशांचया प्रदेशाच्या विकासासाठी भारतीय संविधानातील कलम 371 (2)नुसार राज्यपालांना असलेल्या विशेष अधिकारानुसार स्थापन करण्यात आलेली हे वैधानिक विकास मंडळे मुदतवाढ देण्याचे टाळून बंद पाडणे अन्यायाचे आहे.

महाराष्ट्राचे लोकनेते आदरणीय पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांनी मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने सतत पाठपुरावा आणि जन आंदोलने करून वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेची मागणी धसास लावली होती. महाराष्ट्राच्या विधिमंडळाने एकमुखी ठराव 1984 संमत करून केंद्र शासनाकडे पाठवला होता. 1993 पर्यंत राज्य व केंद्र सरकार मध्ये पत्रव्यवहार व चर्चा होत राहिली. महाराष्ट्र जनता विकास परिषदेने अनेकवेळा केंद्र शासनाकडे शिष्टमंडळ नेवून मागण्या सादर केल्या. 1990 साली मा. श्री विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान असताना विदर्भ आणि मराठवाडा वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याचा निर्णय केंद्र शासनातर्फे घोषित करण्यात आला. त्यानंतर 1992 साली पी. व्ही . नरसिंह राव पंतप्रधान असताना यासंबंधी निर्णय घेण्याचे आश्वासन म.ज.विकास परिषदेच्या शिष्टमंडळाला देण्यात आले होते. अखेरीस 9 मार्च 1994 रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी या संबंधीचे आदेश काढल्यावर मा. राज्यपालांनी 30 एप्रिल रोजी अध्यादेश प्रसिद्ध केला आणि एक मे 1994 पासून तो अंमलात आला. कामकाजासंबंधीचे नियम 5 ऑगस्ट 1995 रोजी जाहीर करण्यात आले. अशा प्रकारे संविधानातील तरतुदीनुसार रीतसर आणि वैधरित्या स्थापित झालेली प्रादेशिक विकास मंडळे 1994 पासून ते 2020 पर्यंत ( 25 वर्षांहून अधिक काळ) कार्यरत असलेली ही केवळ पुढील मुदतवाढ न देता स्थगिती किंवा बंद ठेवणे बेकायदेशीरपणाचे आणि शिरजोरीचे कृत्य आहे. सरकारने मागास प्रदेशातील लोकांना विकास मंडळासाठी पुन्हा एकदा संघटित होऊन आंदोलने व संघर्ष करण्यास भाग पडू नये ही कळकळीची विनंती.

**(लेखक मराठवाडा जनता विकास परिषद औरंगाबादचे सरचिटणीस आहेत.)**

# कविता म्हणजे अनुभव अर्थात 'मातीचे डोहाळे'

आधुनिक केसरी




**माणसे कुबड्या लावून उभी राहू शकतात. पण कवितेला स्वतःचे पाय असावे लागतात. ज्या कवितेला स्वतःचे पाय नसतात ती कविता कविता नसते तर कवितेचे बुजगावणे असते. कुर्डूवाडी येथील कवी प्रकाश रामचंद्र क्षीरसागरांची कविता तिच्या पायावर उभी आहे. नव्हे ती चालत आहे. तीही कुण्या ओळखीच्या वाटेवरून नाही तर तिने आपली वाट आपल्या पावलांनी तयार केली आहे. ती 'Unpaved Way'ने जात आहे. ही आनंदाची बाब आहे.**

पुस्तक परीक्षण

चंद्रकांत महामुनी
कुर्डूवाडी, जि. सोलापूर

शब्दांमध्ये अनुभव हवा किंवा सूचन हवे. व्यवहारात पुष्कळ गोष्टी घडतात आणि नष्ट होतात. असा नष्ट होणारा व्यवहार म्हणजे अनुभव नव्हे.अनुभव सदा सतेज, ताजा, टवटवीत जिवंत असतो. भूत-भविष्याने तो बाधित होत नाही. तो सदा वर्तमान असतो. असा व्यवहार जो विशेषत्वाने वसत असतो तो अनुभव. अनुभव सुखामध्ये सुख (आनंद) देतोच पण दुःखामध्येही सुखरूपच असतो. अनुभव हा अमृतस्वरूप असतो आणि अशा अनुभवाची कविता होते. तिच्या ठायी प्रचिती देण्याचे सामर्थ्य असते.

व्यवहारातले विशेषत्व जपण्याचे सामर्थ्य प्रकर्षाने दुःखामध्ये आहे, वेदनेमध्ये आहे.

ती अश्वत्थाम्याची भळभळती जखम आहे, ख्रिस्ताचे ठिबकणारे रक्त आहे, कमंडलूत गंगेला गुप्त करणारे स्तोत्र आहे. कविता वेदनेची होत असते म्हणून ती वेदना आहे. जीवनातील काव्य ज्याला उमगले तो दुःखाला भीत नाही. तो दुःखाचेच वरदान जगंनियंत्याकडे मागतो. अनुभव परोक्ष असतात, अपरोक्ष असतात, लौकिक असतात, अलौकिक असतात, सामाजिक असतात, व्यक्तिगत असतात. प्रत्येक अनुभव कवीने घेतलाच पाहिजे असे नाही.

मानस पातळीवर तो त्याचे अर्जन व सर्जन करू शकतो. कारण तो लोकासह वर्तमान असतो. कवितेने सुंदर शब्दाच्या जंजाळात न सापडता, अगणित प्रतिमांच्या गुंतावळ्यात न गुंतता, नेमक्या शब्दांतून आणि प्रतिमांतून प्रकट झाले पाहिजे. सत्य आणि संक्षेप हा तिचा आत्मा आहे. कवितेला पूर्वनियोजित असे काहीच नसते. एखादा विषय देऊन कविता लिहिता येत नसते. गाणी लिहिता येतात कविता नाही. कविता लिहिण्या अगोदर ती जगली पाहिजे. कवीचे ते जगणे असते. त्यासाठी तो रडत असतो, कुढत असतो. जागरुक मनाने जीवनातील विविध अनुभव तो टिपत असतो. मग कधीतरी, केव्हातरी त्याचा मनाचा रंग घेऊन, तो अनुभव, ती वेदना अपरिहार्यपणे बाहेर येतो. ती कविता असते. कविता अशी रक्तातून आली पाहिजे, रक्ताशी तिचे नाते असले पाहिजे, रक्तानेच कविता लिहिली पाहिजे असे नाही. कवितेचे रक्त जरुर असले पाहिजे. असे कवितेचे रक्त असलेले कवी प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांना कवितेचा ध्यास लहानपणापासूनच लागलेला होता.

वेडेवाकुडे गाईन
परी तुझाच म्हणवीन -

या संतउक्तीप्रमाणे त्यांचे कवितेसाठी झालेले आहे. दहा वर्षांपूर्वी त्यांचा गर्भावल्या संध्याकाळी हा एक कवितासंग्रह प्रकाशित झाला आणि आता हा दुसरा कविता संग्रह प्रकाशित होत आहे. पहिल्या संग्रहात त्यांच्या कवित्वाच्या पाऊलखुणा ठळकउमटल्या आहेत. आता ते बरेच चालून आले आहेत. 'मातीचे डोहाळे' या संग्रहात ६४ कविता आहेत. त्या सर्व 'माती, पाऊस आणि सखी' या विषयाशी संबंधित आहेत. यात निसर्गाला मानवी मनाचे धर्म बहाल करून त्याला कवीने जिवंत केलं आहे.

कवी म्हणतो -

भळी बुजेनात आता
माझ्या अन् मातीच्याही
किती शब्दांचा पाऊस
रोज कोरडाच राही

इथल्या भळींतून वाहणारे रक्त भुईच्या नसांतील आहे. इथली झाडेवेली न्हातीधुती आहेत. कातळ खंतावलेला आहे. नदी-खोऱ्यातून चित्रगाणे गाणारा पक्षी आहे. येथील झाडे टाळ वाजवतात, वारा ताल धरतो आणि वेली नाचू लागतात. माणसांचा खोटेपणा पाहून शहाणा होणारा पाऊस आहे. नदीच्या किनाऱ्याला गुंतलेले मन आहे. काठावर चुंबाचुंबी करणारी पाखरांची गाणी आहेत. अजून काय पाहिजे? त्यांच्या प्रेमकविता त्यांच्या सहचरीच्या, सखीच्या भोवती फेर धरणाऱ्या आहेत. सौभाग्यलेणं लेऊन त्या आलेल्या आहेत. प्रकाश क्षीरसागरांनी हे सौभाग्याचं लेणं आपल्या कविता आणि कामिनीच्या बाबतीतही पुढील आयुष्यात असंच सांभाळावं. त्यांच्या हातून सारस्वताची सेवा घडावी. त्यांच्या कविता नव्या शब्दांच्या आणि प्रतिभांच्या भाषेत बोलाव्यात त्या सूक्ष्माहून सूक्ष्माकडे जाव्यात, अशी अपेक्षा करून, त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा देऊन थांबतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभु व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# एक दिवसाची शिक्षिका

आधुनिक केसरी


**मी छोट्या इयत्तेत असताना दहावीच्या वर्गातली मुल एखाद्या शिक्षकाचे रूप धारण करून आम्हाला शिकवायला यायचे. तो दिवस मला खूप आवडायचा. तेव्हापासून मी मनाशी पक्क केलेले होते की, इयत्ता दहावीत गेल्यावर या उपक्रमात सहभाग नोंदवून हा” एक दिवसीय शिक्षक “होण्याचा अनुभव घ्यायचा. अखेर तो दिवस आलाच. आमच्या वर्गशिक्षकांनी आदल्या दिवशी आम्हाला उपक्रमात सहभागी होण्यास विचारणा करताच मी लगेच माझा हात वरून अनुमोदन दिले. आमच्या शाळेत इयत्ता ५वी ते ७वी सकाळ अधिवेशन तसेच इयत्ता ८ वी ते १० वी दुपार अधिवेशन अशी व्यवस्था होती. माझी या उपक्रमाकरता आवड लक्षात घेता मला बाईंनी सकाळ अधिवेशन मधील इयत्ता ६वी चा वर्ग व दुपार अधिवेशन मधील इयत्ता १०वी चा वर्ग “मराठी” विषय शिकवण्यास जबाबदारी दिली.**

“शिक्षक” या शब्दात संपूर्ण विद्यापीठ सामावलेले असते. मी एक साहित्यिक आहे. खरे सांगायचे तर मला शिक्षण क्षेत्रात कार्यरत व्हायचे होते परंतु काही कारणास्तव नाही शक्य झाले. आपल्यातले जे जे चांगले आहे ते जीव ओतून समोरच्या विद्यार्थ्यांला देणे हा शिक्षकी पेशा करता आवश्यक असणारा मुख्य गुण माझ्यात दडलेला होता. याची प्रचीती मला आली तेव्हाचा अनुभव सामायिक करते. मुंबईतील माझी शाळा “दयानंद” मालाड (पश्चिम) येथे मी इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत होते. सालाबादप्रमाणे त्याही वर्षी शिक्षक दिन साजरा करण्याचा बेत आखण्यात आला. आमच्या शाळेत दर शिक्षक दिनाला इयत्ता दहावीत शिकणारे विद्यार्थी एक दिवसाकरता शिक्षकांच्या भूमिकेत असायचे व त्यांच्यावर वर्गांतील विद्यार्थ्यांना एखाद्या पाठ शिकवण्याची जबाबदारी दिलेली असायची. मी छोट्या इयत्तेत असताना दहावीच्या वर्गातली मुल एखाद्या शिक्षकाचे रूप धारण करून आम्हाला शिकवायला यायचे. तो दिवस मला खूप आवडायचा. तेव्हापासून मी मनाशी पक्क केलेले होते की, इयत्ता दहावीत गेल्यावर या उपक्रमात सहभाग नोंदवून हा” एक दिवसीय शिक्षक “होण्याचा अनुभव घ्यायचा. अखेर तो दिवस आलाच. आमच्या वर्गशिक्षकांनी आदल्या दिवशी आम्हाला उपक्रमात सहभागी होण्यास विचारणा करताच मी लगेच माझा हात वरून अनुमोदन दिले. आमच्या शाळेत इयत्ता ५वी ते ७वी सकाळ अधिवेशन तसेच इयत्ता ८ वी ते १० वी दुपार अधिवेशन अशी व्यवस्था होती. माझी या उपक्रमाकरता आवड लक्षात घेता मला बाईंनी सकाळ अधिवेशन मधील इयत्ता ६वी चा वर्ग व दुपार अधिवेशन मधील इयत्ता १०वी चा वर्ग “मराठी” विषय शिकवण्यास जबाबदारी दिली. मला मनापासून आनंद तर झाला होता परंतु त्या सोबत थोडे दडपणही आले होते कारण इयत्ता १०वी चा वर्ग म्हणजे चक्क मी ज्या वर्गात शिकत होते तो “अ” वर्गच मला दिला होता. आपल्याच वर्गातल्या मुलांना शिकवायचे तर दडपण तर येणारच ना..!

मी सर्वप्रथम इयत्ता सहावी मराठीच्या पुस्तकातील एक सुंदर धडा निवडला व तो नीट समजून उमजून घेण्याचा प्रयत्न केला. आता प्रश्न होता तो..मी स्वतः ज्या इयत्तेत शिकतेय त्या वर्गाकरता कुठली कविता अथवा धडा निवडू. समोर माझेच मित्र मैत्रिण असणार होते. खूप विचार केल्यानंतर मी मराठीच्या पुस्तकातील कविवर्य फ. मु. शिंदे यांची “ आई “ ही कविता निवडली.

त्या कवितेचा अभ्यास करून त्यातील महत्वाचे मुद्दे एका कागदावर लिहून ठेवले व वाचन करत राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून माझ्या आईची सुरेख साडी नेसून एका शिक्षिकेचा वेश तर परिधान केला परंतु खरी कसब तर पुढेच होती. वर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सुध्दा करायचे होतेच की..हा विचार डोक्यात घेऊन सकाळी सात वाजायच्या आत मी विद्यालयात प्रवेश केला. बरोबर सात वाजता शालेय प्रार्थना झाल्यावर मी इयत्ता सहावीच्या वर्गावर येऊन पोहचले. सर्व विद्यार्थ्यांनी “एक साथ नमस्ते” म्हणत माझे स्वागत केले. तो क्षण अवर्णनीय होता. नेहमी विद्यार्थीनीच्या भूमिकेत असणारी मी.. आज एक दिवसीय शिक्षिका म्हणून वर्गासमोर उभे होते. आनंद आणि जबाबदारीची जाणीव अशी संमिश्र भावना मनात होती. मी सर्व मुलांना बाकावर बसण्यास सांगून दप्तरातून बालभारतीचे पुस्तक काढावयास सांगितले व जो पाठ शिकवणार होते त्याचे नाव फळ्यावर लिहिले. तो धडा मैत्रीवर आधारित होता. धडा शिकवताना मी इतकी रममाण झाले की.. कधी तास संपला ते कळले देखील नाही. माझ्यासोबत वर्गातील विद्यार्थ्यांनाही धडा शिकताना खूप छान वाटत होते हे त्यांच्या चिमुकल्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या आनंदातून दिसत होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान नयनात साठवून मी वर्गाबाहेर पडले अन् एखाद्या परिक्षा पास झाल्यानंतर जितका हर्ष व्हावा अशीच काहीशी भावना मनात दाटून आली. पहिला पाडाव तर पार केला परंतु पुढचा टप्पा त्यामानाने कठीणच होता. ह्याच विवंचनेत असताना शालेय सकाळ अधिवेशन संपून दुपार अधिवेशनातील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेत हजेरी लावली. शालेय प्रार्थने नंतर



मी इयत्ता दहावीच्या
म्हणजे आमच्याच
आले. मी कुमारभारती
पुस्तकातील कवीवर्य

वर्गावर
म्हणजेच मराठीच्या
फ.मु. शिंदे

ह्याची “आई “ ही कविता शिकवण्यास सुरूवात केली. फळ्यावर कवितेचे नाव लिहून त्या कवितेतील प्रत्येक ओळीचा सारांश जो मी आदल्या दिवशी वहीत लिहून ठेवला होता तो मुलांना संदर्भासहित समजावून सांगण्याकरता कवितेतील खालील ओळी पासून सुरूवात केली.

“आई एक नाव असतं घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं!”

आश्चर्य म्हणजे मी वहीत बघून हा सारांश विद्यार्थ्यांना वाचून दाखवण्याचे योजले असताना त्याक्षणी अशी काही किमया झाली की सर्व सारांश सांगेपर्यंत मी अक्षरशः ती वही उघडलीच नाही. एखाद्या कुशल शिक्षिके प्रमाणे मी ती कविता मुलांना शिकवायला सुरुवात केली. कदाचित माझीच आंतरीक ओढ,आवड मला सहकार्य करत होती. संपूर्ण सारांश दिल्यानंतर वर्गातील एक मुलगा पटकन बोलला “ झाली कविता शिकवून..” त्याच्या वाक्यावर प्रत्युत्तर देत मी जेव्हा असे म्हटले, “नाही हा फक्त सारांश होता. आता कविता शिकवेन..” तेव्हा तो चकित झाला. मी माझ्या परीने रंगवून,अर्थ समजून उमजून कविता शिकवली. सर्वांनी त्या कवितेचा रसास्वाद घेतला. कविता पूर्ण झाल्यावर विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे दिली व अशा पध्दतीने तो मराठीचा तास पूर्ण झाला. मधल्या सुट्टीनंतर प्रत्येक वर्गातील एका विद्यार्थ्याला अथवा विद्यार्थ्यांनीला आपले मनोगत व्यक्त करण्याकरता मुख्याध्यापकांनी बोलावले व त्यांचे अभिप्राय माईक वरून सर्वांना ऐकवले. त्यावेळी आमच्या वर्गातील एका मुलाने मनोगत व्यक्त करताना म्हटले, “मराठी विषयाचा तास आम्हाला खूप आवडला. कवितेचा भावार्थ, प्रत्येक शब्द अर्थासकट नीट समजला. “ हे कौतुक ऐकल्यावर माझा आनंद गगनात मावेनासा झाला. ज्याकरता इतकी मेहनत घेतली होती त्याचे सार्थक झाले होते. त्यादिवशी मी एक दिवसाची शिक्षिका नसून ती माझीच अनुभवाची शाळा होती असे मला जाणवले. आज जरी ते शालेय शिक्षण संपले असले तरी आयुष्यरूपी शाळेत मात्र मी अजूनही विद्यार्थीनी आहे अन् नित्य नवा अनुभव घेतेय. हे ही नसे थोडके..!

**कस्तुरी देवरुखकर**
**मुंबई, संपर्क क्र. 82911499922**

# ...अन्यथा विनाश अटळ



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**स्वीडन व फिनलंडच्या डोक्यात नाटोचे भुतं शिरवुन ब्रिटन आगीत तेल ओतण्याचे काम करत असुन पुतिनला आणखी भडकवीण्याचे काम करीत आहे.यामुळे पुन्हा तिसऱ्या महायुद्धाची ठिंनगी उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

रशिया -युक्रेन युध्द सुरू असतांनाच फिनलैंड व स्वीडन यांचे नाटो प्रेम जगाला महाविनाशाकडे नेवु शकते. स्वीडन आणि फिनलैड ब्रिटनच्या मदतीने नाटोमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक आहेत.यासाठी अनेक वर्षांपासून त्यांचे कसोटीचे प्रयत्न सुरू आहेत.या कामात ब्रिटन अग्रेसर आहेत.त्यामुळे आता स्वीडन व फिनलैंडने नाटोमध्ये सहभागी होण्याचे पुर्ण मन बनवीले आहे.त्यामुळे फिनलैंड व स्वीडनने नाटोमध्ये सहभागी होण्याकरिता अर्ज सुध्दा केला आहे.परंतु रशिया समर्थीत नाटो देशातील तुर्की हा स्वीडन व फिनलैंडला नाटोमध्ये सहभागी करून घेण्यास तयार नाही.नाटोमध्ये सहभागी होण्यासाठी संपूर्ण नाटो देशांची सहमती घ्यावी लागते.परंतु तुर्की रशियाच्या बाजुने असल्याने स्वीडन व फिनलैंडच्या नाटो प्रवेषात खलल निर्माण झाल्याचे दिसून येते. स्वीडन व फिनलंडच्या डोक्यात नाटोचे भुतं शिरवुन ब्रिटन आगीत तेल ओतण्याचे काम करत असुन पुतिनला आणखी भडकवीण्याचे काम करीत आहे.यामुळे पुन्हा तिसऱ्या महायुद्धाची ठिंनगी उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.पुतिनने स्पष्ट शब्दात सांगीतले आहे की स्वीडन व फिनलैंडने नाटो मध्ये सहभागी होण्याचे आम्ही कदापि सहन करणार नाही.त्या पध्दतीने रशियाने संपूर्णपणे फिनलैंड व स्वीडनच्या विरूद्ध जय्यत घेराबंधी केली आहे.त्यामुळे केव्हा कधीही फिनलैंड व स्वीडनची परिस्थिती युक्रेन सारखी होवू शकते. वेळ पडल्यास अनुबॉम्बचा वापर करायला पुतीन मागेपुढे पाहणार नाही व याचे प्रायश्चित्त जगातील संपूर्ण मानवजातीला भोगावे लागले.यासाठी अमेरिका,नाटो, ब्रिटन, फिनलैंड व स्विडन यांनी रशिया -युक्रेन संघर्षात जहर घोळण्याचा प्रयत्न करू नये.अन्यथा जगात विनाशलीला उदयास येईल.सध्याच्या परिस्थितीत जगात विनाशलिलेला प्रारंभ झालेला आहे. कारण शांतता प्रस्थापित करण्याच्यामुडमध्ये कोणीही नाही.परंतु संघर्षाला वेळीच थांबवीले नाही तर जगाचा विनाश अटळ आहे यात दुमत नसावे. युक्रेन-रशिया युध्दानंतर आता प्रत्येक छोठा-मोठा देश आपल्या रक्षणासाठी अत्याधुनिक मिसाईल, दारूगोळा,अनुबॉम्ब यांचा साठा जमा करीत आहे. यामुळे जगातील प्रत्येक देशाचे रक्षा बजेट दुपटीने व तिप्पटीने वाढत आहे.यामुळेच जगातील प्रत्येक देशात महागाई शिखराला पोहोचल्याचे दिसून येते. नाटो, अमेरिका व खासकरून ब्रिटन ज्याप्रमाणे जेलेन्सकीला भडकवुन आगीत लोटले त्याचप्रमाणें स्विडन व फिनलैंड या छोट्या देशांना अमेरिका,नाटो व ब्रिटन बेचीराख करण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येते. आताही काही बीघडले नाही स्वीडन व फिनलैंडने नाटोची हट सोडावी कारण अमेरिका व ब्रिटन हे दोन्ही देश धोकेबाज आहेत.याचे उदाहरण म्हणजे अफगाणिस्तानातील नरसंहार व युक्रेनमधील मृत्यू तांडव आहे. अमेरिका व ब्रिटनला रशियाचा विकास पहावल्या जात नाही.त्यामुळेच अमेरिका, ब्रिटन व नाटो रशियाच्या विरूद्ध त्यांच्या शेजारच्या छोट्या-छोट्या देशांना भडकवुन आगीत झोकुन बेचीराख करीत आहे.त्यामुळे रशियाच्या सिमावर्ती देशांनी अमेरिका व ब्रिटन पासून सावध रहाण्याची गरज आहे. खासकरून ब्रिटन मोका पहात आहे की रशियाने नाटो देशावर हल्ला करावा व त्याचा फायदा घेऊन पुतिनला कमजोर करावे.ब्रिटनची दुसरी चाल हे सुद्धा आहे की रशियाने ब्रिटनवर हल्ला करावा.कारण ब्रिटनवर हल्ला म्हणजे नाटोवर हल्ला समजण्यात येतो.अशा परिस्थितीत नाटोसह संपूर्ण युरोपियन देश रशिया विरूद्ध तुटून पडतील.यावरून स्पष्ट होते की दिवसेंदिवस रशिया-युक्रेन युध्द तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने जातांना दिसत आहे.उत्तर युरोपियन सिमावर्ती भागात परीस्थिती अत्यंत गंभीर आहे.कारण संपूर्ण देशांनी अत्याधुनिक दारूगोळा आप-आपल्या सिमावर्ती भागात तैनात केलेला आहे.युक्रेन-रशियाच्या संघर्षात मोल्डोवा युक्रेनला मदत करीत असल्याने मोल्डोवा आता रशियाच्या निशान्यावर आहे.त्यामुळे तोही युध्दाच्या आगीत होरपळून शकते.यामुळे आता पोलंड सहीत ५ देश रशियाच्या निशाण्यावर आहे.त्यामुळे आता युध्दाचे वातावरण निवळत नसुन दिवसेंदिवस चिघळत आहे.त्यामुळे युद्धजन्य परिस्थिती जर रशियाच्या आवाक्याबाहेर गेली तर पुतिन जवळ परमाणु बॉम्ब हाच पर्याय आहे.कारण पुतीनची वारंवार ऍटमी हल्याची धमकी देत आहे.त्यामुळे पुढे काय होईल हे सांगणे कठीण आहे.स्वीडन व फिनलंडने नाटोचा सदस्य बनण्याकरीता प्रयत्न केलाच तर रशिया पुर्ण ताकदीने फिनलंड व स्वीडनवर हल्ला करेल.यामुळे फिनलंड व स्वीडनची हालत युक्रेन पेक्षा भयावह होवू शकते.याकरिता फिनलैंडची प्रधानमंत्री सन्ना मारिन आणि राष्ट्रपती सौली नीनिस्टो यांनी कोणाच्याही आवेशात जावु नये व आपल्या देशातील नागरिकांचा जीव धोक्यात टाकू नये असे मला वाटते.कारण फिनलैंड व स्वीडनची थोडीसी चुक विनाशाच्या वाटेवर नेऊ शकते. फिनलंड नाटोमध्ये सहभागी झाला तर रशियाला बाल्टिक महासागरमध्ये धोका निर्माण होऊ शकतो.यामुळे रशिया फिनलंड नाटो मध्ये सहभागी होण्याचे कदापि सहन करणार नाही.त्यामुळे रशियाने बाल्टिक सागरातसुध्दा आपली तैनाती मोठ्या प्रमाणात वाढवीली आहे.रशियाची वाढती ताकद पहाता अमेरिकेने नुकताच 183A हायपर्सॉनिक मिसाईल टेस्ट केल्याने मोठा हडकंप मचलेला आहे. त्यामुळे युध्दाची शर्यत निर्माण झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत बाल्टिक महासागरमध्ये नाटो व रशिया सेना 60 किलो मीटर अंतरावर वॉरप्रॅक्टीस करीत आहे.म्हणजेच सध्याची स्थिती भयावह आहे.सध्याच्या परिस्थितीत रशिया आणि इजरायल यांच्यातील वाढती तनातनी विध्वंसक मार्गाकडे जावु शकते.सध्याच्या परिस्थितीत ब्लॅकसी व बाल्टिक सागर महारणक्षेत्र बनल्याचे दिसून येते.त्यामुळे केव्हाही कधीही महायुद्ध छेडल्या जादु शकते.

# मधमाशी : शेतकऱ्यांसाठी ठरत आहे वरदान

आधुनिक केसरी

**मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत.**

आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहिले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला. या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते. मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे.

मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमाशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे. मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क : ९९२२५४६२९५

# ‘भटकेगिरी’




संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

आधुनिक केसरी

**द्वारकानाथ संझगिरींचे क्रिकेट, चित्रपट व पर्यटन याविषयीचे लेख अनेक वर्षे वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत आहेत. त्यांनी क्रिकेटसाठी खूप भटकंती केली आहे. ‘भटकेगिरी’ हे त्यांचे सव्विसावे पुस्तक आहे. या पुस्तकात एकूणपन्नास लेख, पाच भागात विभागले आहेत. या पुस्तकातून संझगिरी वाचकांना वेगवेगळ्या देशात फिरवतात. तिकडचा अप्रतिम निसर्ग दाखवतात. वेगवेगळी प्रेक्षणीय स्थळे, राजवाडे व कॅथेड्रल दाखवताना त्याचा इतिहासही उलगडून सांगतात. चमत्कार वाटतील अशी निसर्गातील आश्चर्ये दाखवतात. आणि त्यामागचे विज्ञानही सांगतात. या भटकंतीतून त्यांची ज्या लोकांशी मैत्री जमते ते वाचकांनाही आपलेसे वाटतात. संझगिरी खवय्ये असल्यामुळे या सफरीत अनेक ठिकाणची खाद्यसंस्कृतीही समजते.**

ऑस्ट्रेलियाला मुलाकडे गेल्यावर ते नातीबरोबर रमतात. तिचा निरोप घेताना भाऊक होतात. त्यांनी केन्र्सला जगातील सर्वात मोठा बॅरियर रीफ पाहिला. बॅरियर रीफ म्हणजे समुद्रातील रंगीबेरंगी माशांचं, शंख शिंपल्यांच जग स्वच्छ पारदर्शक पाण्यामुळे उघड्या डोळ्यांनी दिसतं. केन्र्स जवळ रेन फॉरेस्ट डेन्ट्री किंवा कुरांडा ही ट्रॉपिकल प्रकारची जंगले आहेत.
उष्ण दमट हवामान व भरपूर पाऊस या वातावरणात तयार झालेल कुरांडाच जंगल किर्र आहे पण भयाण नाही. स्कायरेल या साडेसात किलोमीटरच्या केबल कार मधून ते पाहता येत. स्कायरेल मधून जंगल बघताना झाडाच्या शेंड्यावरून तरंगत चालल्यासारखं वाटतं. स्कायरेलच्या काचेच्या तळातून बघताना हिरव्या रंगाच्या वेगवेगळ्या शेड्स व मयूरपंखी समुद्र दिसतो. त्याच अप्रतिम वर्णन संझगिरीनी केलं आहे. सुंदर निसर्ग बघताना त्यांना खंडाळा व माथेरानची आठवण झाली. पण देवाने दिलेल्या सुंदर निसर्गात रंग भरून त्याचं मार्केटिंग आपल्याकडे होत नाही याची संझगिरीना खंत वाटते.
संझगिरींची शैली ओघवती, प्रसन्न व रंजक आहे. त्यांनी पिसाचा झुकलेला मनोरा पाहिला. त्याची छान विस्तृत माहिती दिली आहे. तो ज्या चौकात उभा आहे त्याला स्क्वेअर ऑफ मिरॅकल म्हणतात. तिथे एक बॅप्टिस्टा चर्च व दुसरं कॅथेड्रल आहे. पिसाचा टॉवर हा बेल टॉवर म्हणून उभारला गेला. त्याचे पहिले चार मजले उभारल्यानंतर जवळपास शंभर वर्ष काम थांबले. नंतरच्या सहा वर्षांत ते काम सातव्या मजल्यापर्यंत गेले. पुन्हा जवळपास ऐंशी वर्ष काम थांबले आणि मग टॉवर उभारून मनोरा पूर्ण केला. काम थांबण्याचं एक कारण पैसे व दुसरं त्याचं दक्षिणेकडे झुकण. पहिल्या चार मजल्याच्या वेळी मनोरा उत्तरेकडे झूकत होता. आता तो दक्षिणेकडे झुकायला लागला आहे. त्याच कारण तो ज्या जमनिवर बांधला ती कमी जास्त प्रमाणात खचत होती. पण काम थांबल्यामुळे जमिनीला सेटल व्हायला वेळ मिळाला. नंतर बेल चेंबर बांधताना त्यात गॉथिक आणि रोमन स्थापत्यकलेचा मिश्रण केलं. सात सुरांच्या सात घंटा बसवल्या. जगातील स्थापत्यशास्त्रज्ञ, गणितज्ञ व इतिहासकार यांनी एकत्र येऊन प्रयत्न केले. आता त्याच झुकण थांबलय.
कॅप्री हे बे ऑफ निपल्स मधल बेट आहे. या बेटाच्या डोंगरात साठ मीटर लांब, पंचवीस मीटर रुंद आणि खोली दीडशे मीटर अशी गुहा आहे. खाली पांढरी शुभ्र रेती आहे. गुहेत शिरायचा मार्ग अरुंद आहे. त्यामुळे एकावेळी एकच पडाव आत जातो किंवा बाहेर येतो. गुहेत गेल्यावर आधी अंधार मग दिव्य प्रकाश, चंदेरी पाणी दिसते. त्याच सुंदर वर्णन संझगिरीनी केले आहे नंतर त्यामागचं विज्ञानही ते सांगतात.
हिंदुस्तानात तनखे रद्द झाल्यावर काही राजानी महालाची हॉटेल्स केली. तर काहींनी महाल इतरांना हॉटेल करण्यासाठी दिले. अश्या काही सुंदर महाल हॉटेल्स माहिती पुस्तकात आहे.
भटकेगिरी करताना ऐतिहासिक स्थळे, कलात्मक वस्तू आणि अप्रतिम निसर्ग याबरोबरच संझगिरीना त्या प्रदेशातील माणसेही महत्त्वाची वाटतात आणि एखाद्या ठिकाणी वारंवार गेल्यावर मैत्रीचे धागे ही पक्के होतात. त्यांची श्रीलंकन दौऱ्यात राय




डायस या शैलीदार फलंदाजाबरोबर, ललित कालूपेरूमा या श्रीलंकन ऑफ स्पिनर व त्याचा सासरा चार्टर्ड इंजिनियर शेली विक्रमसिंघे यांच्या बरोबर अतूट मैत्री झाली. बार्बाडोसच्या मैदानावर प्रेसबॉक्स बघायला आलेला डॉक्टर नीलेश मेहताही त्यांचा चांगला मित्र झाला.
त्यांनी १८०७ मध्ये कॅण्डीच्या शेवटच्या सिंहली राजाने बांधलेला तलाव, राजाचा राजवाडा व बुद्धाच्या दाताच मंदिर पाहिलं. संझगिरीनी सांगितलेली बुद्धाच्या दाताची कथाही वाचनीय आहे. केरळ, गोव्यासारख् निसर्गसौंदर्य लाभलेलं श्रीलंका हे एक पाचूचे बेट आहे. श्रीलंकेत मसाले दर्जेदार व स्वस्त मिळतत. त्यांचं जेवणही अतिशय मसालेदार असतं. ते नारळाचं तेल खूप वापरतात. कासवाच्या आकाराचा खेकडाही संझगिरीनी श्रीलंकेत खाल्ला.
संझगिरींचे चित्रपटावर खूप प्रेम होते. त्यानी गाईड सिनेमा अठ्ठावीसवेळा पाहिला. तो बघून ते उदयपूर व चित्तोडला जाऊन आले. सज्जनसिंग नावाच्या महाराजाने इंग्लंडमधून क्रिस्टलच्या काही वस्तू मागवल्या होत्या. त्याची संझगिरीनी सांगितलेली गोष्ट वाचण्यासारखी आहे. इंदोरच्या खाऊ गल्लीतील आणि छप्पन दुकान एरियातील चटकदार खाणे, गोव्यातील हिरव्या निसर्गात वसवलेली सुंदर देवळे अशी भरपूर भटकंती त्यानी केली आहे.
भटकेगिरी हे पुस्तक वाचताना देशातील व परदेशातील प्रसिद्ध व अप्रसिद्ध पर्यटन स्थळांची, जुन्या ठिकाणांच्या इतिहासाची व अनेक ठिकाणच्या खाद्य संस्कृतीची रोचक माहिती मिळते आणि वाचकांनाही भटकंती करावीशी वाटते.

# जम्मा जागरण कार्यक्रमास भाविकांचा उदंड प्रतिसाद

## सोयगाव येथे बाबा रामदेव यांच्या सुमधुर भजनाने भाविक मंत्रमुग्ध

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सोयगाव येथे आयोजित रुणेचा धाम रामदेव बाबांचा जम्मा (भजन) जागरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सोयगाव येथे पाहिल्यांदाच जम्मा जागरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. हैद्राबाद येथील प्रसिद्ध संगीतकार व गायक सुशील गोपाल बजाज यांच्या सुमधूर भक्तिगीतांच्या कार्यक्रमाने बहार आणली. या कार्यक्रमात दिवंगत प्रसिद्ध गायक गोपाल बजाज यांच्या ‘खम्मा-खम्मा हो रामा रूनिचे रा धनिया’ सारख्या भजनांनी लक्ष वेधले. आरती, पूजाविधी आणि भजनाच्या कार्यक्रमात अबालवृद्ध दंग झाल्याचे यावेळी दिसून आले. पंचायत समितीच्या मैदानात राज्यमंत्री अब्दुल सत्तार मित्र मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महसुल तथा ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. बाबा रामदेवजी यांचा जम्मा जागरणातून बंधुता आणि सामाजिक एकतेचा संदेश मिळतो. तसेच एक सकारात्मक ऊर्जा जम्मा जागरणातून मिळते, असे प्रतिपादन राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी केले.
सिल्लोड येथे बाबा रामदेव यांचे मंदिर उभारण्यासह सिल्लोड - सोयगाव मधील भाविकांना राजस्थान येथील बाबा रामदेव मंदिर येथे दर्शनाला घेऊन जाण्यासाठी सर्वोतोपरी मदत करण्याची ग्वाही राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी दिली.
जम्मा जागरण कार्यक्रम करून घेतला. शिवसेना नगरसेवक



व पदाधिकाऱ्यांनी सुयोग्य नियोजन करून कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजू राठोड, तालुकाप्रमुख प्रभाकर काळे, तालुका संघटक दिलीप मचे, नगराध्यक्षा श्रीमती आशाबी तडवी, उपनगराध्यक्ष सुरेखाताई आबा काळे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अर्जुन पा. गाढे, माजी जि.प. उपाध्यक्ष केशवराव तायडे, सिल्लोड कृउबा समितीचे उपसभापती नंदकिशोर सहारे, जि.प. सदस्य गोपीचंद जाधव, माजी सभापती धरमसिंग चव्हाण, सरपंचपती सुरेश चव्हाण, नॅशनल सुत गिरणीचे संचालक विशाल जाधव, मारुती वराडे, मनोज झंवर, भिकचंद कर्णावट, शिवापा चोपडे, बाबू चव्हाण यांच्यासह नगरसेवक हर्षल काळे, शाहिस्ताबी बागवान, दीपक पगारे, वर्षा घणगाव, संध्याताई मापारी, कुसुम दुतोंडे, संतोष बोडखे, संदीप सुरडकर, भगवान जोहरे, ममताबाई विष्णू इंगळे, आशियाना शहा, लतीफ शहा, अशोक खेडकर, गजानन माळी, मा. नगरसेवक संदीप चौधरी आदींसह शहर व परिसरातील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# विद्यार्थ्याची प्रवासात गहाळ झालेले कागदपत्रे केली परत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** दि.१२ रोजी विनोद लोखंडे हे कामावरुन घरी परत असताना रस्त्यावर त्यांना एक पिशवी निदर्शनास आली असता त्यांनी ती पिशवी उचलली व त्या पिशवीत काय आहे, असे बघितले असता त्यात एका लहान मुलाचे शाळेत ऍडमिशन करण्यासाठी सर्व मुळ कागदपत्रे होती. त्या पिशवीत त्या मुलाच्या आई, वडिलांचा फोन नंबर नसल्यामुळे कागदपत्रे त्या मुलाच्या आई वडिलांपर्यंत पोहचवणार कशी? असा विचार विनोद लोखंडे यांच्या मनात आला असता त्यांना मुलाचे पासपोर्ट फोटो दिसले त्यांनी ताबडतोब त्या फोटो स्टुडिओ मालक यांच्याशी संपर्क साधून त्यांना सांगितले असता त्यांनी आजूबाजूला विचारपूस केली असता त्या लहान मुलाच्या आई-वडीलांनी ताबडतोब विनोद लोखंडे यांच्याशी संपर्क साधला व पत्ता विचारून सिवूड दारावे या भागात गेले असता हरवलेली कागदपत्रे बघून त्यांच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू आले. साहजिकच ते पण औरंगाबाद येथील होते पण नोकरीसाठी बदली झाली असता मुंबई येथे स्थायिक झाले. विनोद लोखंडे यांचे त्यांनी मनापासून आभार व्यक्त केले.

# जिल्ह्यातील कोलाम बांधवांचे प्रश्न व समस्या प्राधान्याने सोडवा : राज्यमंत्री बच्चू कडू

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील कोलाम समुदायांचे अनेक प्रश्न व समस्या आहेत, हे प्रश्न व समस्या सुटेल तरच येथील कोलाम बांधवांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणता येईल. त्यामुळे येथील बांधवांना भेडसावणारे प्रश्न व समस्या प्राधान्याने सोडवा, अशा सूचना राज्याचे जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, कामगार राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू यांनी दिल्या. जिवती तालुक्यातील पाटण, सितागुडा येथील कोलाम गुड्यावर कोलामांशी चर्चा करताना ते बोलत होते.
यावेळी माजी आमदार ॲड. वामनराव चटप, कोलाम विकास फाउंडेशनचे अध्यक्ष विकास कुंभारे, प्रा. प्रशांत कडू, ॲड.दीपक चटक, तहसीलदार प्रवीण चिडे, गटविकास अधिकारी पेंदाम, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील टेंभे, आरोग्य अधिकारी डॉ. कविता शर्मा, बालविकास अधिकारी स्वप्नील जाधव, पुरवठा निरीक्षक सविता गंभीरे तसेच कोलाम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.
या भागात जलसंधारण, जमिनीचे पट्टे, जातीच्या दाखल्याचे वाटप, राशनकार्ड वाटप व आरोग्य सुविधा ही तीन ते चार महत्त्वाची



कामे आहेत. ती कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे, असे सांगून राज्यमंत्री बच्चू कडू म्हणाले, येथील कोलाम बांधवांकडे अद्यापही राशनकार्ड नाही, राशनकार्ड वाटप केल्यास त्यांना स्वस्त धान्य मिळेल. दुर्गम भागातील कोलाम बांधवांना राशनकार्ड मिळावे यासाठी 6 ते 16 जूनपर्यंतच्या कालावधीत राशनकार्ड मोहीम राबवावी. पुरवठा निरीक्षकांनी स्वस्त धान्य दुकानात वेळोवेळी भेटी द्याव्यात. पाच ते सहा कोटी रुपयांचे काम जलसंधारणाच्या माध्यमातून या भागातील आदिवासी पट्ट्यात करण्यात येत आहे. त्यामुळे सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा या भागात निर्माण होणार आहे. पाणी कुठे थांबते, तलाव कुठे करता येईल यासाठी तहसीलदार, गटविकास अधिकारी, जलसंपदा व जलसंधारण विभागांनी सर्व्हे करावा. सिंचन विहिरीची कामे अद्याप झालेली नाही ती कामे पूर्णत्वास न्यावीत. त्यासोबतच जलसंधारणाच्या कामाबाबत ॲक्शन प्लॅन तयार करण्याच्या सूचना उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.
राज्यमंत्री कडू पुढे म्हणाले, जलसंधारणाची कामे या भागात करण्यात येत आहे. त्या माध्यमातून येथील कोलाम बांधवांच्या हाताला काम मिळेल. 90 दिवसाच्यावर काम केले तर त्यांना कामगार खात्याशी जोडता येईल व कामगार विभागाच्या 19 योजनांचा लाभ या बांधवांना देता येईल. तसा सांगड घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. खडकी ग्रामपंचायतीतील 9 गुडे मिळून रोजगार हमीचा प्लॅन करावा. या 9 गावांमधील घरातील प्रत्येकी एका व्यक्तीला रोजगार हमीमध्ये काम मिळावे यासाठी एक परिवार एक मजूर हे अभियान राबवावे. तसेच गावातील 600 लोकांना काम मिळेल यासाठी नियोजन करावे. व त्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा.
जूनमधील पहिल्या आठवड्यात शेतीच्या ठिकाणी सीताफळ, बांबू लागवड, फळझाडे इत्यादींची लागवड करावी. त्या ठिकाणी 200 झाडे लावण्याचे नियोजन कृषी सेवकांनी करावे. गावातील विधवा महिला,आजारी महिला याची माहिती ठेवावी. दुर्लक्षित वाडे तसेच कोलाम बांधवांसह इतर समाजासाठी आरोग्य कॅम्प आयोजित करावे. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, बालसंगोपन योजना या व्यक्तिगत योजनांच्या अभियानाचे आयोजन करावे.
रोजगार सेवकांच्या या भागात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून घरकुलाची बोगस कामे मोठ्या प्रमाणात या ठिकाणी झाली आहे. घरकुलाची कामे ही ठेकेदारी पद्धतीने सुरू असून ही कामे तात्काळ बंद करावी. घरकुलाची किती कामे ठेकेदारी पद्धतीने सुरू आहे याची गावनिहाय माहिती तहसीलदारांनी घ्यावी, असेही ते म्हणाले.
याप्रसंगी राज्यमंत्री कडू यांच्या हस्ते आदिम कोलाम या पुस्तीकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी राज्यमंत्री कडू यांनी कोलामांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न व समस्या जाणून घेतल्या. त्यांच्या समस्या व प्रश्नांची सोडवणूक करून कोलामांच्या विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यास कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त केले.

# मनसेचे साखर आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने साखर आयुक्त यांच्या साखर संकुलन पुणे कार्यालयासमोर सरकार विरोधी जोरदार घोषणा देऊन, धरणे आंदोलन करण्यात आले. दि.१८ मे २०२२ रोजी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, संतोष नागरगोजे, प्रकाश काका महाजन, गणेश सातपुते, अशोक तावरे, सतनाम सिंग गुलाटी यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन कार्यक्रमानंतर साखर आयुक्त यांना मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी म्हणून निवेदन देण्यात आले, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातील जिल्हाध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी, उपस्थित होते.

यावेळी मनसे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी जालना जिल्ह्यातील बागेश्वरी साखर कारखान्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करून, जालना जिल्ह्यातील परतुर मंठा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची नियोजित कट रचून फसवणूक केल्याप्रकरणी बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजी जाधव, कार्यकारी संचालक यांच्यावर मानसिक व आर्थिकहानी, आत्महत्येस प्रवृत्त करणे असे प्रकार केल्यामुळे मा.साखर आयुक्त पुणे यांनी कायदेशीर पोलिसात गुन्हा नोंद करून या भागातील ज्या शेतकऱ्यांच्या ऊस गाळप झाला नाही. त्या शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी म्हणून बागेश्वरी साखर कारखान्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, परतुर मंठा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची नियोजित कट रचून फसवणूक केल्याप्रकरणी बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजी जाधव यांच्यावर कारवाई यावी कारण २०२०/२०२१ या कालावधीत हंगामात बागेश्वरी साखर कारखान्याकडे ६ लाख टन उसाची नोंद होती, परंतु पूर्ण प्लॅनिंग करून २०२१/२०२२ या कालावधीत हंगामासाठी १ नोव्हेंबर २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या एक महिन्यात उसाची लागवड केली तरच आम्ही उसाची नोंद घेऊ असे कारखान्याचे चेअरमन शिवाजी जाधव, अधिकारी, कर्मचारी, यांनी विभाग वाईज शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन शेतकऱ्यांना सांगत होते. मग शेतकऱ्यांनी याच कालावधीत ४ लाख टन उसाची लागवड केली, ही लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून उसाची नोंद कारखान्याकडे घेण्यासाठी व करून गाळप करण्यासाठी प्रतीएकरी १० हजार रुपये डिपॉझिट घेऊन ३५% शेतकऱ्यांचा ऊस गाळप करता आला नाही, तसेच २०२२/२०२३ या हंगामात देखील परतूर मंठा तालुक्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस गाळप होणार नाही ? करण २०२१/२०२२ या वर्षी परतूर मंठा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊस गाळप पूर्ण प्लॅनिंग करून उशीर केला ऊस गाळप करण्यासाठी किमान १२ महिन्याच्या ऊसाला सरासरी १० रिकवरी येते, परंतु बागेश्वरी साखर कारखान्याने ऊस गाळप करण्यासाठी या हंगाम १४/१५/१६/१७/१८,महिन्याचा कालावधी लावल्यामुळे पूर्ण ऊसात साखर निर्माण झाली, नेमके हेच करायचे होते बागेश्वरी साखर कारखान्याने अतिरिक्त उसाची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना भाग पाडले, ही फसवणूक नियोजित कट रचून केल्यामुळे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान करणे हाच कारखान्याचा उद्देश होता कारण, त्या शेतकऱ्यांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले, त्याला आत्महत्येस प्रवृत्त करणे, आशा सगळ्या गोष्टीचा विचार करून बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजी जाधव व कार्यकारी संचालक अमित शिवाजी जाधव यांनी शेतकऱ्यांची फसवणूक आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची अपेक्षा आहे.

चार दिवसात हा प्रश्न मार्गी लागला नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी दिला. बागेश्वरी साखर कारखान्याच्या गलथान कारभाराबाबत साखर आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. त्या निवेदनावर मनसे नेते दिलीप धोत्रे, संतोष नागरगोजे, जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# नादरपूर ग्रामस्थांचे आश्वासनानंतर आमरण उपोषण मागे

## अनेक शासकीय काम शासन दरबारी प्रलंबितच रोज मिळत आहे "तारीख पे तारीख"



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील नादरपुर येथील विविध शासकीय कामास मंजुरी मिळून सुद्धा सुरुवात होत नसल्याने या गावातील विकास कामाला गती मिळत नाहीत, वारंवार पत्र व्यवहार करून सुद्धा संबंधित विभागाचे अधिकारी-कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याने मंगळवारपासून नादरपुर येथील ग्रामस्थांनी उपोषणाला सुरुवात केली आहे तसेच उपोषण सुरु होऊन दुपार उलटल्याने तहसील कार्यालयाचे सदर मागण्याबाबत लक्ष केंद्रीत करण्यात आले व शासनस्तरावर मागणी मंजुरीसाठी तालुका स्थरावरील प्रलंबित मागण्या 15 दिवसाच्या आत निकाली काढण्याचे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण तुर्तास उपोषण मागे घेण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात जिल्हा परिषद शाळा ते अंजना नदीपर्यंत संरक्षण भींत उभारणे, मौजे नादरपुर येथील पाणंद रस्ते मोकळे करणे, रमाई आवास योजना, घरकुल व प्रधानमंत्री आवास योजना कार्यरंभ आदेश मिळणेबाबत, माळराणावर जाण्याचा रस्ता मंजुरी मिळण्याबाबत, रोहयो वैयक्तिक लाभच्या योजना प्रस्ताव मंजूर करण्यात बाबत आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. मागण्या पूर्ण न झाल्याने पुन्हा उपोषण करण्यात येईल, असा पवित्रा ग्रामस्थांनी केला. यावेळी बाबुराव निकम, गणेश निकम, पोपट निकम, बाबुराव निकम, कारभारी निकम, नारायण चोतमल, रमेश निकम, संतोष काथार हे उपोषणाला बसले असता समर्थन म्हणून आदिनाथ निकम, भगवान निकम, दादाराव निकम, कृष्णा काथार, किरण निकम, योगेश काथार, कृष्णा निकम, प्रहार संघटनेचे तालुका भरत चौधरी, अखिल भारतीय छावा संघटनेचे गोविंद निकम, रविंद्रा अजमेरा, रघुनाथ गायकवाड, अॅड. कृष्णा जाधव, रियाज शेख, भाऊसाहेब पठाडे, डॉ. शैलेश मोहिते, अनिल गांगुर्डे इत्यादींनी उपोषणाला पाठिंबा दिला.



# जर्नी ऑफ व्हेटरनरी पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठान मराठवाडा औरंगाबाद यांची मासिक सभा संपन्न झाली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त न्यायमुर्ती नरेन्द्र चपळगावकर व अध्यक्षस्थानी डॉ. अरविंद मुळे हे होते. प्रथम प्रमुख पाहुणे नरेंद्र चपळगावकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. डॉ. शाम जावळीकर लिखीत जर्नी ऑफ व्हेटरनरी या पुस्तकाचे प्रकाशन नरेंद्र चपळगावकर व डॉ. मुळे यांच्या हस्ते यांच्या मोठ्या उत्साहात प्रकाशन करण्यात आले. बिडवाई व डॉ. पारगावकर यांनी प्रस्तावना लिहिली व त्याबद्दल आपले विचार मांडले. त्यानंतर डॉ. श्याम कुलकर्णी यांनी डॉ. जावळीकर यांचा परिचय करून दिला.

दुसऱ्या सत्रात संघटनेचे सचिव डॉ. अरविंद देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ अरविंद मुळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. शेवटी डॉ. डावरे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. सभेस ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त भराडी येथे भव्य रक्तदान, आरोग्य शिबिर व कीर्तनाचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भराडी :** आरोग्य क्षेत्रात आरोग्यदूत म्हणून ख्याती असलेले महाराष्ट्र राज्याचे माजी जलसंपदा तथा वैद्यकीय शिक्षण मंत्री आमदार भाजपा नेते गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त बॅनरबाजी अनावश्यक खर्च टाळून समाज उपयोगी कार्यक्रम आयोजित करून पाळधी पंचायत समिती गणामध्ये विविध समाजोपयोगी कार्यक्रम घेण्यात आले. भराडी भाजपा वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर औषधोपचार करण्यात आले.

यावेळी शेकडो रुग्णांची आरोग्य तपासणी स्त्रीरोग तज्ञ डॉ.राजेश नाईक व डॉ.सागर पोतदार यांनी नेत्ररोग तपासणी केली. नेत्र तपासणीमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया आढळलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी जळगाव येथे उपचार करण्यात येतील. रक्ताचा तुटवडा भासत असल्यामुळे माजी मंत्री तथा आमदार गिरीश महाजन यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान हेच श्रेष्ठदान उक्तीप्रमाणे भराडी गावांमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 64 रक्तदात्यांनी रक्तदान केले तसेच समाजप्रबोधनाचा महत्वपूर्ण कार्यक्रम कीर्तन रात्री 8 वाजता शिवकीर्तनकार मनोज महाराज राजपूत यांचे भव्य जाहीर कीर्तन भराडी ग्रामपंचायत मैदानावर पार पडले.

यावेळी भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष निलेश चव्हाण, पाळधी भाजपा गणप्रमुख आनंदा जंजाळ, पाळधी मा.सरपंच कमलाकर पाटील, भाजयुमो तालुका उपाध्यक्ष महेंद्र चौधरी, विजय शिरसाठ, विशाल धांडे, विकास वंजारी, कैलास पालवे, वैभव नाईक, माळपिंपरी मा.सरपंच विकास श्रीखंडे, सोपान पाटील, पाळधी मा. सरपंच सोपान सोनवणे, मनोज नेवे, संजय शेळके, अक्षय जाधव, पद्माकर पाटील, प्रदीप पाटील, अतुल पाटील, योगेश डवणे, चंद्रकांत पाटील, योगेश पाटील, दुर्गेश अपार, मनोज वानखेडे, विजय चौधरी, नवल पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील सर्व वारकरी संप्रदायातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गिरीशभाऊंचा वाढदिवस म्हणजे आम्हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांसाठी जणू उत्सवच असतो. भाऊंच्या आदेशाप्रमाणे वाढदिवस साजरा न करता समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा मानस उराशी बाळगून भव्य रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार तसेच सामाजिक प्रबोधनपर शिवकीर्तनकार मनोज महाराज यांचे कीर्तन आयोजनाचे कार्य यंदाच्या वाढदिवसानिमित्त करण्यात आले होते मागच्या वर्षी वाढदिवसाचे औचित्य साधून वाचनालयास पुस्तके उपलब्ध करून दिली होती.**

**आरोग्यदूत मनोज जंजाळ**

# गोड उसाने केले कडू अन् कांद्याने आणले रडू !!

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** आपला देश कृषि प्रधान मानला जातो. फक्त मानला जातोच का? होय खर आहे. एकीकडे महागाईने गगनभरारी घेतली.यात सर्वसामान्य नागरिक चांगलाच होरपळून निघत आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांना घाम गाळून भरपूर कष्ट, खर्च करून शेतात पिकवलेल्या कांद्याला भावाच नाही, तर एक पीक म्हणजेच गोड उस कडूपणा दाखवत अजूनही जशाच तसा शेतात उभा आहे. यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्याला "वाली''कोन अशी गत सध्या झाली आहे. गावात फक्त युवा नेते, शेतकरी नेते नावालाच आहेत का? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडत आहे. गळीप हंगाम संपत आळा तरी उस शेतात तसेच उभे आहेत.

शेतकरी सकाळ उठल्यापासून तर झोपेपर्यंत उस आणि कांदे याचेच चिंताजनक प्रश्न त्याला पडत आहे. करावे तरी काय! आज कांदा बघितला तर अफाट खर्च करूनही खर्च निघत नाही. कांदा साचून ठेवायचा तर त्यालाही खर्चच खर्च. कांदा चाळीमध्ये कांदा साचून ठेवला जातो. साचून ठेवल्याने उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होत असते. पंरतु कांदा टिकतो का? नाही याची पण शाश्वती धरता येत नाही. कांदा जास्त दिवस राहिल्याने सडतो. हे सर्व शेतकरी सहन करून चांगला कांदा बाजूला काढून विक्री साठी काढला जातो. पुढे भाव मिळेल का? नाही हे सांगता येत नाही. म्हणजे सर्व राम भरोसे. जिल्ह्याच्या बऱ्याच भागात शेतकरी कांदा पिकाची लागवड करत असतात. कांद्याला देशभरातून मागणी असल्याने चांगला भाव मिळून उत्पन्न चांगले मिळण्याची शेतकऱ्यांना खुप आशा असते पण कांद्याला योग्य दर न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी नीराशा होत असते. वर्षभर कधीपण बेमोसमी अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ अशा अनेक समस्यांना शेतकऱ्याला तोंड द्यावे लागते, अशाही परिस्थितीतीत संघर्ष करत, न डगमगता शेतकरी मोठ्या कष्टाने शेतीवर रात्रंदिवस मेहनत करून शेती फुलवतो, मात्र कवडीमोल दरात शेतमाल विकावा लागतो तेव्हा त्याच्या कष्टावर पाणी फिरले जाते. जर असेच असले तर शेतकरी कर्जबाजारी झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारने या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याची गरज आहे.



## गोड उसाची कडू कहाणी..

**दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मोठ्या आशेने ऊसाची लागवड शेतकऱ्यांनी केली. परंतु ऊसाने अक्षरशः कडूपणा आणला आहे. ऊस कधी तुटून जातो म्हणून शेतकरी वणवण फिरताना दिसत आहे. रोज मजुराकडे, टोळी मुकरदम, कारखाना यांकडे चकरा मारत आहे. काही शेतकरी स्वतः मजूर बघून अधिक खर्च करून ऊस कारखान्याला पाठवत आहे. काही शेतकरी तर अजुनही चिंतेत आहे. अधिक पैसा खर्च करून किंवा देऊनही उसाला तोडणी मिळत नाही हे. यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**


# गाव तिथे निर्भया पथकाची स्थापना करावी

### वणी शहरात ग्रामीण पोलीस स्टेशनची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** मारेगाव तालुक्यातील पहापळ येथील सहा वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराविरुद्ध उपविभागीय पोलिस अधिकारी याची भेट घेऊन आरोपीवर कडक कार्यवाही करण्यात यावी व खटला जलद गती न्यायालयात चालवुन पीडित बालिकेला लवकर न्याय मिळावा म्हणून सन्मान स्त्री शक्ती फाउंडेशन च्या वतीने शेकडो महिलांच्या वतीने निवेदनाच्या माध्यमातुन मागणी करण्यात आली आहे.
पांढरकवडा येथील वकील संघटनांची भेट घेऊन कुठल्याही वकिलांनी ती केस घेऊ नये यासाठी निवेदन देण्यात आले.
यावेळी पीडित कुटूंबातील सर्व लोक उपस्थित होते. समोरील न्यायालयीन कामात आम्ही सर्व महिला आपल्या कुटूंबासोबत आहोत, असे सन्मान स्त्री फाउंडेशन च्या वतीने सांगण्यात आले. वेळप्रसंगी चिमुरडीला न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलन पण करण्यात येणार आहे. यावेळी पत्रकार परिषदेसाठी महिला उपस्थित होत्या.
यावेळी किरणताई देरकर संस्थापिका अध्यक्षा सन्मान स्त्री शक्ती फाउंडेशन, ॲड हुमेरा खान मारेगांव, वृषाली खानझोडे माजी उपसभापती पं.स.वणी, कवीता सोयाम सरपंच विरकुंड, सुरेखा ढेंगळे अध्यक्षा व्यसनमुक्ती, उज्वला चांदेकर, नीता जगताप, रेखा बोबडे, मनीषा हेपट शिंदोला, रूपाली बोबडे शिंदोला, ममता पारखी मुकुटबन, सीमा लालसरे सरपंच अडेगांव, इंदुताई किन्हेकार माजी नगराध्यक्षा मारेगांव, जिजाताई वरारकर संचालिका एकवीरा महिला पतसंस्था मारेगांव, कांचन भोपरे, जयश्री विधाते, माधुरी सचिन बोढाले, संगीता डुमोरे, प्रतिभा भोपरे आदी शेकडो महिला उपस्थित होत्या.





# सायली चॅरिटेबल ट्रस्टला आमदारनिधीतून रुग्णवाहिका भेट


आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** पडेगाव येथील मिटमिटा सायली चॅरिटेबल ट्रस्टच्या होमियोपॅथी महाविद्यालयास आमदार सतिष चव्हाण यांच्या स्थानिक विकास निधीमधून रुग्णवाहिका देण्यात आली. या कार्यक्रमाचा लोकार्पण सोहळा मिटमिटा येथे पार पडला या रुग्णवाहीकेचे लोकार्पण राज्यमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते फित कापून नारळ फोडून करण्यात आले.
यावेळी आमदार सतिष चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष तथा माजी आमदार कैलास पाटील, संस्थेचे अध्यक्ष डॉ.पि. वाय. कुलकर्णी, अक्षय कुलकर्णी, प्राचार्य डॉ.उमा कुलकर्णी, प्राचार्य डॉ.आभिजित पोहेकर, मिटमिटा स्थानिक, डॉ.गणी पटेल आदिंची प्रमूख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार डॉ.कल्पना राखूंडे यांनी केले. यावेळी परीसरातिल मिटमिटा, पडेगाव, अप्पावाडी, करौडी, शरणापूर येथील ग्रामस्थ, विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी, महाविद्यालय कर्मचारी वर्ग आदींची मोठी उपस्थिती होती.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY



MAHAVIR
GHAR SANSAR
• Wholesale & Retail
• Kirana, Dry Fruits, Spices
• Crockery, Home Appliances
• Home Cleaning Material, Steel & Aluminium
• Plastic Items & Many More
Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad



SP Entertainer
Singers Pride | Heart to Heart Music
@ Musical Events @ Stage Shows
@ Party / Functiones
Track Showes + LED Wall
Marathi - Hindi old & new Songs
Ghuzales, Bhajans / Natya Geet
Singing Classes on Karaoke Track
You Can Start your Own Business



S.P. Deshpande
Shant Prabha 120, TilakNagar,
Aurangabad, 9730527669

# पुण्यतिथी, वाढदिवसाचा खर्च टाळून केले वृक्षारोपण

## राजूरमधील व्यावसायिकांचा समाजाभिमुख उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** सध्या समाजात दिखाऊपणा आणि खोट्या प्रतिष्ठेसाठी वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात साजरे करण्याची जणू चढाओढच लागली आहे. मग त्यासाठी पार्ट्या, फटाक्यांची आतिषबाजी, केक कापणे, डीजेच्या तालावर थिरकून वाढदिवसाच्या नावाने हजारो रुपयांची उधळपट्टी होत असल्याचे चित्र समाजात पहावयास मिळते. परंतु याला अपवाद म्हणून राजूर येथील व्यवसायिकांनी कुठल्याही प्रकारचा बडेजाव न करता पुण्यतिथी आणि वाढदिवसाच्या खर्चातून राजूर येथील स्मशानभूमीत विविध झाडांच्या कलमांचे वृक्षारोपण करून व सामाजिक बांधिलकी जोपासून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला आहे.
सविस्तर माहिती अशी की राजुर येथील प्रसिद्ध व्यापारी कै. गणेशआप्पा हिंगमिरे यांचे मागील वर्षी कोरोना आजारामुळे निधन झाले होते. त्यांचे प्रथम पुण्यस्मरण होते. तर दुसरीकडे राजूर येथील बांधकाम व्यवसायिक भीमाशंकर दारुवाले, विष्णू पुंगळे



यांचाही वाढदिवस होता. या दोन्ही कार्यक्रमाचे निरोप देण्यासाठी राजूर येथील व्यवसायिक शिवशक्ती आश्रम तुपेवाडी येथील परमपूज्य गुरुवर्य बालयोगी खंडेश्वरी बाबा यांना निरोप देण्यासाठी गेले असता, बाबाजींनी पुण्यतिथी व वाढदिवसाचा अनाठाई खर्च टाळून आपण वृक्षारोपण करावे असा सल्ला दिला. तो मान्य करत राजूर येथील व्यावसायिकांनी विविध वृक्षांच्या कलमांचे परमपूज्य गुरुवर्य बालयोगी खंडेश्वरी बाबा ह.भ.प. आत्माराम महाराज कदम यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला आहे.
यावेळी परमपूज्य खडेश्वरी बाबा, ह.भ.प. आत्माराम महाराज कदम, व्यापारी संघाचे सचिव सारंगधर बोडखे, सामाजिक कार्यकर्ते प्रा. बाळासाहेब बोराडे, पंढरीनाथ करपे, भीमाशंकर दारूवाले, कैलास गबाळे, सतिश तवले, ॲड. संदीप दारूवाले, राजू ठोंबरे, आर.एच. दानवे, ऋषीधर थोट, बबन शेटे, अशोक हिंगमिरे, शंकर गुळवे, डॉ. ईश्वर जटाळे, डॉ. सुरेश सेठिया, सिद्धेश्वर लंगोटे, देशमाने, जीतकर, सुनील कोमटे, वसंत कोमटे, गजानन डांगे, गणेश फुटांकर, योगेश जितकर, विष्णू पूंगळे, विशंभर तवले, नामदेव रजाळे, महालिंगाप्पा तवले, कैलास दारुवाले, शिवा हाजबे, स्वप्नील दारूवाले, शिवलिंग कर्दळे, गणेश ढाकणे, आशुतोष दारुवाले, विनायक कोमटे, सुरेश दारुवाले, भगवान पिंपळे, बबन जाधव, सुनील मगरे, रतन भोसले आदीजणांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# राष्ट्रवादीच्या ओबीसी पदाधिकाऱ्यांची मुंबईत राज्यस्तरीय बैठक

## बीड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे : रूक्मानंद खेत्रे

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** दि.२५ मे बुधवार रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेल महाराष्ट्र प्रदेश द्वारा केंद्र सरकारकडून ओबीसींचे हक्क हिसकावण्याच्या विरोधात, सपत्नीक वागणूक, जातीय जनगणना, ओबीसींचे राजकीय आरक्षण, बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार यांच्यावर आलेले आर्थिक संकट, ओबीसी व्हिजेएनटी यांच्यासाठी संघर्षाचा लढा, मंडल आयोगाची संपूर्णपणे अंमलबजावणी अशा अनेक महत्त्वपूर्ण विषयावर राष्ट्रवादी भवन, बलार्ड इस्टेट, मुंबई येथे राज्यस्तरीय बैठक होणार असुन बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ओबीसी पदाधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष रूक्मानंद खेत्रे यांनी केले आहे.
बैठकीस प्रदेशाध्यक्ष ना जयंत पाटील, ओबीसीचे राष्ट्रीय नेते तथा अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्री ना. हसन मुश्रीफ, ना. जितेंद्र आव्हाड, ना. धनंजय मुंडे, ना दत्ता भरने, ना. आदिती तटकरे, प्रदेशाध्यक्ष ईश्वर बाळबुधे यांचे मार्गदर्शन होणार आहे.
मार्गदर्शनापूर्वी ओबीसी घटकातील विविध समाज बांधव, पदाधिकारी यांचे सोबत चर्चासत्र तसेच त्यांना भेडसावऱ्या समस्या आणि वेळेवर येणाऱ्या विषयावर विचारमंथन होणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेलचे राज्यातील प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, तालुकाध्यक्ष आणि ओबीसी चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते यांची उपस्थिती राहणार आहे.




# माजी सभापती मारुती साळवे, ज्येष्ठ पत्रकार ताराचंद म्हस्के यांचा राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अहमदनगर जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार ताराचंद म्हस्के पाटील आणि औरंगाबाद जिल्हा परिषदेचे माजी सभापती मारुती साळवे यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.
राष्ट्रवादी प्रदेश कार्यालयात हा प्रवेश कार्यक्रम पार पडला. ताराचंद म्हस्के पाटील यांनी मागील अनेक वर्षे पत्रकारिता करताना परखड मते मांडण्याचे काम केले आहे, असे अजित पवार म्हणाले. या मान्यवरांचे नगर व औरंगाबाद या दोन्ही ठिकाणी पक्ष संघटना बळकट होण्यासाठी नक्कीच सहकार्य मिळेल. पक्षाचे विचार आणि ध्येयधोरणे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम होईल. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षासाठी हा पक्ष प्रवेश प्रभावी ठरेल असा विश्वासही अजित पवार यांनी व्यक्त करून त्यांचे पक्षात स्वागत केले.
या पक्ष प्रवेश कार्यक्रमाला महिला प्रदेशाध्यक्षा विद्याताई चव्हाण, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, युवक कार्याध्यक्ष सूरज चव्हाण, औरंगाबाद जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, अशोक थोरात, बाळासाहेब सावंत, हरिभाऊ डव्हान, युवक प्रदेश उपाध्यक्ष अमोल मातेले उपस्थित होते.

# अजिंठा येथील श्रीराम मंदिर संस्थानच्या अध्यक्षपदी लक्ष्मण चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** रझाकारी संघर्षातून उभारल्या गेलेल्या अजिंठा येथील ऐतिहासिक आणि श्रीराम मंदिर संस्थानच्या कार्यकारिणीची नुकतीच निवड करण्यात आली. यात अध्यक्ष म्हणून सर्वानुमते लक्ष्मण भाऊसाहेब चव्हाण, उपाध्यक्षपदी प्रविण रामधन ढाकरे तर सचिवपदी विजय पुंडलिक पगारे यांची निवड करण्यात आली आहे.
सविस्तर वृत्त असे की, अजिंठा येथील ऐतिहासिक व ख्यातिप्राप्त श्रीराम मंदिर संस्थान ची कार्यकारिणी निवडण्यासाठी दि. 5 मे 2022 रोजी गावकऱ्यांची बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीत गावकऱ्यांनी सर्वानुमते 18 जणांची सदस्य म्हणून निवड केली होती. व या 18 नवनिर्वाचित सदस्यांना अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव या पदाची निवड करण्याचे अधिकार बहाल केले होते. दि.16 मे 2022 रोजी नवनिर्वाचित 18 सदस्यांची बैठक होऊन यात बिनविरोध मधून सर्वानुमते अध्यक्षपदी लक्ष्मण भाऊसाहेब चव्हाण, उपाध्यक्षपदी प्रविण रामधन ढाकरे तर सचिवपदी विजय पुंडलिक पगारे यांची निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून शिवप्रशाद फकिरचंद पुरे, रघुनाथ बाबुराव चव्हाण, सुनीलकुमार रामनाथ मेठी, दिलीप नामदेव झलवार, मदनसिंग देवचंदसिंग राजपूत, अर्जुनसिंग रामसिंग राजपूत, कैलास भाऊलाल झलवार, प्रशाद भारत झलवार, अनिल शिवाजीराव चव्हाण, उल्हास पुंडलीकराव शेजवळ, सुजित सुभाष गुप्ता, उमेश श्रीकिसन कुलवाल, रणछोडदास नारायणदास वैष्णव, श्रीकांत लक्ष्मण दसरे, दिपक गोकुळ चव्हाण यांची निवड करण्यात आली.
यावेळी श्रीराम मंदिर संस्थानचे मावळते अध्यक्ष भारत किसन झलवार यांच्या मागील कार्याचा गौरव करीत त्यांचा नरसिंगराव चव्हाण यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी पुरणसिंग तोमर, धनलाल झलवार, अरुण चव्हाण, अनिल गुप्ता आदींची उपस्थिती होती. सर्वांनी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सदस्य यांचे अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीसाठी यशस्वी शुभेच्छा दिल्या.



**“ श्रीराम मंदिराचा द्वितीय भव्य जिर्णोद्धार करणे, अभ्यासिका, व्यायामशाळा, परिसर सुशोभिकरण करणे हे आमचे भविष्यातील संकल्प आहेत. गावकऱ्यांनी नवतरुणांना ऐतिहासिक श्रीराम मंदिर संस्थानचा कार्यभार चालवण्याची संधी दिली, त्याबद्दल आम्ही सर्व कमिटी त्यांचे आभारी आहोत.**

**लक्ष्मण भाऊसाहेब चव्हाण**
**अध्यक्ष : श्री राम मंदिर संस्थान, अजिंठा**

# महागाई विरोधात समाजवादीचा मोर्चा




आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सातत्याने महागाई वाढत असून भाववाढीने उच्चांक गाठला आहे. सर्वसामान्य गरिब जनता कामगार मजूर ते लहान मोठे व्यावसायिक सर्वच वर्गाला महागाईचा मार बसत आहे. या विरोधात आज समाजवादी पार्टीने मोर्चा काढत केंद्रसरकारचा तिव्र निषेध करीत आंदोलन केले.
समाजवादी पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करून लक्ष वेधले तसेच निवेदन देण्यात आले. पेट्रोल, डिझेलच्या किंमती शंभर पार होऊन दोनशेच्या दिशेने जात आहेत. स्वयंपाकाचा गॅस हजाराच्यावर गेला आहे. गरिबांना चूल पेटविण्यासाठी लाकडेही मिळत नाहीत. खाद्यतेल, दूध, भाजीपाला, औषधे सर्वच प्रचंड महागले आहे. अशा वेळी जनतेने जगायचे कसे असा प्रश्न विचारत रेशनदुकानावर पुन्हा केरोसिन वाटप सुरू करावे आणि महागाईला आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी जमील मन्सुरी, अकिल अन्सारी, गुड्डू काकर, अमिन पटेल, असिफ इनायत इनाम सिद्धिकी, जाकीर खान, इम्रान शेख रशीद शाह, गुलाम कुरेशी, आलमगीर शेख, आसिफ पठाण, डॉ. सरफराज, बब्बू मिस्त्री आदि उपस्थित होते.



# माजलगावात 70 रूपये प्रतिलिटर दूध

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** पेट्रोल, डिझेलमुळे सर्वत्र महागाईचा चटका बसत असुन या वाढत्या महागाईत दुग्धव्यावसायिक शेतकरी व डेअरी चालकांचे देखिल आर्थिक नुकसान होत असल्याने माजलगाव शहरात 70 रूपये प्रतिलिटर दुध करण्याचा निर्णय आज दि. 7 गुरूवारी घेण्यात आला.
शहरातील बायपास रोडवर असलेल्या तुळजाभवानी मंदिरात दुध डेअरी असोशिएशनच्या वतीने दुग्धव्यावसायिक शेतकरी व दुध डेअरी चालकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीस दुध डेअरी असोशिएशनचे अध्यक्ष पांडुरंग लांडे, उपाध्यक्ष पांडुरंग कुलथे, सचिव रवि शेजुळ यांची उपस्थिती होती. बैठकीत दुध दरवाढीबाबत चर्चा करत म्हैशीचे दुध 70 तर गायीचे दुध 60 रूपये प्रतिलिटर करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीस धनंजय आगे, महेश दांडे, माउली सक्राते, अनिरूध्द कुरे, मुंजा शेंडगे, योगेश धुमाळ, भिमराव पवार, हरी सवरा, राजू सवरा, रामा डामले, हरीभाउ ढगे, दत्ता नावडकर, कैलाश झगडे, कृष्णा लिंगे, दत्ता हिंगण, प्रदिप खांडेकर, विलास कदम, विक्रम खांडेकर, दिपक नावडकर, शिवाजी पवार, गणेश नावडकर, संतोष मोरे, बाबा कदम, अशोक जगदाने, संजय क्षिरसागर यांचेसह दुग्धव्यावसायिक उपस्थित होते. दरम्यान या निर्णयाची अमंलबजावणी सर्व दुध डेअरी चालकांनी करावी असे आवाहन दुध डेअरी असोशिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# पत्रकारांनी सकारात्मक कार्याची देखील दखल घ्यावी : राज्यपाल

## राज्यपालांच्या हस्ते २१ वे राजर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ध्येयनिष्ठ व निर्भीड पत्रकार समाजाला प्रतिबिंब दाखवीत असतात; परंतु अधिकांश पत्रकार छिद्रान्वेषी असतात. समाजातील त्रुटींवर बोट ठेवत असताना चांगल्या कामाची दखल घेणे हे देखील तितकेच आवश्यक आहे असे सांगून पत्रकारांनी सकारात्मक कार्य करणाऱ्यांना देखील कौतुकाची थाप द्यावी, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज येथे केले.

विश्व संवाद केंद्र, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारे २१ वे देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते बुधवारी (दि.१८) राजभवन, मुंबई येथे प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार प्रकाश जोशी यांना यावेळी पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल व समाज




माध्यम क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना देखील राज्यपालांच्या हस्ते देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

टिका-टिप्पणी व निंदा करण्यात एक प्रकारचा आनंद असतो आणि त्यामुळे एक मोठा वर्ग प्रभावित देखील होत असतो. अशावेळी शाश्वत जीवन मूल्यांवर आधारित चांगली पत्रकारिता करणाऱ्या गुणी पत्रकारांना शोधून सन्मानित करीत असल्याबद्दल राज्यपालांनी विश्व संवाद केंद्राचे कौतुक केले.

राज्यपालांच्या हस्ते ज्ञानदा कदम एबीपी माझा, आलोक निरंतर व्यंगचित्रकार, दिपक जोशी छायाचित्रकार, दिनेश कानजी वृत्तसंकेतस्थळ, न्यूज डंका अश्विन अघोर, घनघोर युट्यूब चॅनल प्राजक्ता हरदास, गुणवंत पत्रकार विद्यार्थिनी, रोहित दलाल (समाजमाध्यम), अभिराज राजाध्यक्ष आणि नियती माविनकुर्वे, आकाश सुभाष नलावडे व अभिजित चावडा (समाजमाध्यमे) यांना २१ वे नारद पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष सुधीर जोगळेकर, निवड समितीच्या सदस्य वैजयंती आपटे तसेच कोकण प्रांताचे संघचालक डॉ. सतीश मोध यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



# शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी : संजय खंबायते

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्यासाठी भाजपचे नायब तहसीलदार श्रीमती मोनाली सोनवणे यांना निवेदन देण्यात आले. तालुक्यात उन्हाळी सोयाबीन पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड झाली असून सोयाबीनचे बोगस बियाणे व प्रशासनाची शेतकऱ्यांच्या बाबतीत उदासीनता यामुळे शेतकरी प्रचंड संकटात आला आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ पंचनामे करून एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी असे मागणीचे निवेदन नायब तहसीलदार श्रीमती मोनाली सोनवणे यांना भाजपतर्फे देण्यात आले असून जिल्हा उपाध्यक्ष संजय खांबायते, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस गणेश घुगे, तालुका सरचिटणीस सुभाष काळे, भक्तराज मुळे, काकासाहेब तायडे, प्रदीप बोडखे, भावेश शिंदे, अनिल सोनावणे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंदू देवतांविषयी आक्षेपार्ह पोस्ट; कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** स्थानिक रहिवासी मधुरिका स्टुडिओचे संचालक चारुदत्त जिचकार यांनी फेसबुकवर हिंदू देवी-देवतांबद्दल अत्यंत हीन दर्जाचा मजकूर टाकून समस्त हिंदू समाजाचा घोर अपमान केला आहे. त्यांचे हे कृत्य अत्यंत संतापजनक असून धार्मिक भावना भडकाविणारे आहे, अशी तक्रार बजाजनगर पोलिस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आली. संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत सह-महामंत्री अमर कुळकर्णी, रणशिंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रफुल्ल माटेगावकर, ज्येष्ठ रंगकर्मी विनय मोडक, विदर्भ विकास मंडळाचे माजी तज्ज्ञ सदस्य डॉ. कपिल चांद्रायण व इतर सदस्यांनी यांनी पोलिस निरीक्षक शुभांगी देशमुख व पोलिस सहाकय प्रविण पांडे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले व धार्मिक भावना



भडकावणाऱ्या दोषींवर त्वरित कारवाई करावी अशी मागणी केली आहे. यावेळी अरविंद उपाध्ये, महेंन्द्र ढोले, गौरव टांकसाळे, मोहन पांडे, मृण्मयी कुळकर्णी, अपूर्वा माटेगांवकर, विक्रम जोशी, परिमल जोशी, डॉ. आशिष अटलोये, अनिकेत दहेकर व नागरिक उपस्थित होते.

# पन्नास दुकानांचे भव्य व्यापार संकुल उभारणार

## ग्रामविकास तथा महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** नगर पंचायतीचे उत्पन्न वाढावे व स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी सोयगाव येथे पन्नास दुकानांचे भव्य व्यापार संकुल उभारणार असल्याची घोषणा महसुल तथा ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली. या व्यापार संकुलामध्ये शहरातील दिव्यांग तसेच महिलांसाठी काही दुकाने आरक्षित असतील असे राज्यमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले.

सोयगाव नगर पंचायतीच्या माध्यमातून शहरातील दिव्यांग लाभार्थ्यांना 5 टक्के प्रमाणे प्रतिव्यक्ती 1 हजार 214 प्रमाणे 70 लाभार्त्यांना धनादेश तसेच प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत टप्पा 1 ते 4 मधील एकूण 68 लाभार्त्यांना घरकुल अनुदान धनादेशाचे वाटप राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले. यावेळी डीपीआर 3 साठी नवीन घरकुल लाभार्त्यांच्या नोंदणीचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करीत असतांना राज्यमंत्री अब्दुल सत्तार बोलत होते. शहरातील जुना बाजार चौकात हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजू राठोड, तालुकाप्रमुख प्रभाकर आबा काळे, नगराध्यक्षा आशाबी तडवी, उपनगराध्यक्ष सुरेखाताई काळे, शिवसेना तालुका संघटक दिलीप मचे, शिवसेना गटनेता अक्षय काळे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अर्जुन पा. गाढे, जि.प. माजी उपाध्यक्ष केशवराव तायडे, जि.प. सदस्य गोपीचंद जाधव, मा.सभापती धरमसिंग चव्हाण, सुरेश चव्हाण, सिल्लोड पं.स. सदस्य निजाम पठाण, नायब तहसीलदार विठ्ठल जाधव, गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, एपीआय सुदाम सिरसाट, मुख्याधिकारी सय्यद रफिक, सिल्लोड चे नगरसेवक मनोज झंवर, सिल्लोड तालुका व्यापारी संघाचे अध्यक्ष दुर्गेश जैस्वाल, नॅशनल सुत गिरणीचे संचालक मारुती वराडे, विशाल जाधव, सिल्लोड खरेदी - विक्री संघाचे चेअरमन साळवे, सुदाम सुडके यांच्यासह नगरसेवक हर्षल काळे, शाहिस्ताबी रउफ बागवान, दीपक पगारे, वर्षा राजेंद्र घणगाव, संध्याताई मापारी, कुसुम दुतोंडे, संतोष बोडखे, संदीप सुरडकर, भगवान जोहरे, ममताबाई इंगळे, आशियाना कदिर शहा, लतीफ शहा, अशोक खेडकर, गजानन माळी तसेच मोतीराम पंडित, भगवान वारांगने, रमेश गावंडे, शरीफ शहा, विवेक महाजन, योगेश कळवत्रे आदींची उपस्थिती होती.

सोयगाव शहरात प्रधानमंत्री आवास योजनेसह रमाई आवास, शबरी आवास व अल्पसंख्यांक समाजासाठी असलेल्या घरकुल योजना प्राधान्याने राबवून शहरातील प्रत्येक बेघरांना घरकुल योजनेतून घरे देणार असल्याचे राज्यमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले. सोयगाव शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या 10 टक्के सहभाग निधीची उपलब्धता करून देवू, सोयगाव येथील जागेचा प्रश्न मार्गी लागताच छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या कामाला सुरूवात करण्यात येईल असे राज्यमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले. शहराला नियमित वीज पुरवठा व्हावा, शेंदूरणी रस्त्याचा कामाला सुरुवात करून गुगडी धरणात ईतर ठिकाणाहून पाणी सोडण्याच्या प्रक्रिया पूर्ण करून तात्काळ कामाला सुरुवात करण्याचे निर्देश राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या, अशी माहिती जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी दिली.

